आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शुक्रवार, १२ जानेवारी २०२४

## हिंदवी स्वराज्य संकल्पक

# राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ



बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा येथे १२ जानेवारी, १५९८ मध्ये लखुजीराजे आणि म्हाळसाबाई ऊर्फ गिरिजाबाई यांच्या पोटी जिजाऊंचा जन्म झाला. लखुजी आणि जगदेवराव दोघे जाधव बंधू सिंदखेड येथे राहत होते. म्हाळसाबाई या निंबाळकर घराण्यातील होत्या. जिजाऊंना दत्ताजी, अचलोजी, रघुजी आणि महादुजी असे चार भाऊ होते. माँसाहेब जिजाऊ बालपणापासून अत्यंत हुशार, पराक्रमी, दृढनिश्चयी व स्वतंत्र प्रवृत्तीच्या होत्या. त्यांच्यात धैर्य, स्वाभिमान, समाजाविषयीची आत्मीयता आदी गुण उपजतच होते. त्यांनी अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी लहान वयात तलवार आणि ढाल चालवण्याचे कौशल्य प्राप्त केले होते. दांडपट्टा, अश्वारोहण या युद्ध कला देखील आत्मसात केल्या. त्यांना मराठी, संस्कृत, कन्नड, अरबी, फारसी आणि उर्दु या सहा भाषा येत होत्या. जिजाऊंनी रामायण, महाभारत, नामदेवांचे अभंग, कबीरांचे दोहे, कुराण, बायबल यांचे वाचन केले होते. जिजाऊंना लहानपणापासूनच अन्यायाविषयी चिड होती.



माँसाहेब जिजाऊंचा विवाह मालोजीराजे भोसले यांचे चिरंजीव शहाजीराजे भोसले यांच्या सोबत दौलताबाद येथे डिसेंबर १६०५ साली मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. दौलताबादेजवळ वेरुळच्या परिसरात भोसले राहत असत. देऊळगाव, हिंगणी, बेरडी, जिंती, वेरूळ, बाबी, मुंगी, बनसेंदे अशी दहा गावांची पाटीलकी शहाजीराजेंचे आजोबा बाबाजीराजे भोसले यांच्याकडे होती. मालोजी राजेना निजाम शहाकडून पाच हजारी मनसब, शिवनेरी व चाकण हे किल्ले आणि पुणे व सुपे हे दोन परगणे जहांगीर म्हणून मिळाले. शहाजीराजे भोसले हे निजामशाहीचे सरदार होते. शहाजीराजांनी जिजाऊंना शिवनेरी किल्ल्यात सुरक्षित ठेवले. येथेच १९ फेब्रुवारी १६३० रोजी जिजाऊंनी शिवाजी महाराजांना जन्म दिला. शिवबा उदरी असताना त्या घोड्यावर मांड देऊन शिवनेरीच्या दिशेने घौडदोड करत. गड किल्ले सर करत. राजमाता जिजाऊ व शहाजीराजे यांना सहा मुली तर दोन मुले अशी एकूण आठ अपत्ये होती. माँसाहेब जिजाऊंनी शिवबांना लहानपणीपासून रामायण, महाभारताच्या गोष्टी सांगितल्या. त्याचबरोबर जिजाऊंच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी महाराज युद्ध कला शिकले. गरीब रयतेच्या सुखासाठी स्वतंत्र स्वराज्य बनवावे, ही राजमाता जिजाऊंची इच्छा होती. जिजाऊंना वाटायचे की, सामान्य रयतेला आदिलशाही, निजामशाही व कुतूबशाही यांच्या अन्याय व अत्याचारातून मुक्त करावे. यासाठीचा शिवरायांना त्यांनी आत्मविश्वास दिला. शिवरायांच्या व्यक्तिमत्वात ज्ञान, चारित्र्य, चातुर्य, संघटन, व्यवस्थापन, मुत्सद्देगिरी, शस्त्रविद्या व पराक्रम अशा राजस व सत्त्वगुणांची पेरणी माँसाहेबांनी केली. शहाजीराजांनी व जिजाऊंनी बाळाची क्षमता ओळखली आणि ध्येय ठरवले. 'स्वराज्य' हे शिवबांचे ध्येय १२ व्या वर्षी ठरले. हे पूर्ण करण्यासाठी छोटे मावळे, भगवाध्वज आणि राजमुद्रा घेऊन जिजाऊ पुण्यात आल्या. पुण्यामध्ये अदिलशहाने गाढवाचा नांगर फिरवून लोखंडी पहार रोवली होती. आदिलशहाचा सरदार पंडित मुरार जगदेव कुलकर्णी याने पुण्याच्या ज्या जमिनीवर गाढवाचा नांगर फिरवून, तिथे तुटलेली चप्पल बांधून जो ती जमीन नांगरेल तो निर्वंश होईल, असा शाप दिला होता. त्याच भूमीवर जिजाऊंनी पाच वर्षाच्या शिवबांच्या हाताने सोन्याचा फाळ असलेला नांगर फिरवला. जिजाऊंनी स्वतः शिवबाला लोखंडी पहार उपसायला लावली. तेथे घरे बांधली. शेती करायला सुरूवात केली. हे एका स्त्रीने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत उचलेले धाडसी आणि क्रांतिकारी पाऊल होते.

माँसाहेब जिजाऊंना स्वराज्य हवे होते, हे स्वराज्य केवळ परकीय शोषण आणि सत्तेच्या राजकीय दहशतीतून मुक्तता एवढ्या पुरते मर्यादित नव्हते, तर स्वकीय जुलमी, अन्याय व अत्याचारी यांच्यापासून रयतेची मुक्तता हवी होते. त्याचबरोबर स्वराज्यात स्वधर्म व स्व संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन झाले पाहिजे, यासाठी शिवबांसह माँसाहेब जिजाऊ आग्रही होत्या. पुढे स्वराज्यात शेतकरी समाजातील वर्चस्ववादालाही पायबंध घातला. जुनी वतने रद्द केली. कर कमी केले, शेतकऱ्यांना अनेक सोयी -सवलती उपलब्ध करून दिल्या, म्हनजेच जो शेतकऱ्यांचा विरोधक आहे तो मोगल असो किंवा ग्रामव्यवस्थेतील वतनदार त्याविरुद्ध शिवाजी महाराजांनी संघर्ष केला. यामागे प्रेरणा होती माँसाहेब जिजाऊंची.

शहाजीराजेंनी पुण्यात झांबरे पाटलाकडून जागा विकत घेऊन 'लाल महाल' हा राजवाडा बांधला. इ.स. १६३९ ते १६४७ या काळात जिजाऊ व शिवाजी महाराज लाल महालात वास्तव्यास होते. या काळात शिवबांना जिजाऊंनी तानाजी, येसाजी, बापूजी, बाजी, नेताजी ई. मित्र जोडून दिले. वयाच्या १६व्या वर्षी म्हणजेच २७ एप्रिल, १६४५ ला रायरेश्वराच्या मंदिरात स्वराज्य स्थापनेची शपथ घेतली. यासर्व मित्रांच्या व मावळ्यांच्या सहकार्यातून 'स्वराज्य' उभे राहिले. महाराजांनी स्वराज्य स्थापना करीत असताना इ.स. १६४७ मध्ये सर्वप्रथम हा किल्ला घेतला आणि 'स्वराज्याचे तोरण बांधले' म्हणून या किल्ल्याचे नाव 'तोरणा किल्ला', असे ठेवण्यात आले. पुढे स्वराज्यावर अनेक संकटे आली. अफ़जलखान, दिलेरखान, शाईस्तेखान, सिद्धी जौहर यांच्या आक्रमणप्रसंगी जिजाऊ शिवरायांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. शिवरायांच्या स्वराज्य निर्मितीच्या कार्यात जिजाऊंनी निव्वळ पाठिंबा व आशीर्वाद दिला नाही, तर कृतिशील असे धोरण दिले, कार्यवाही केली. जिजाऊ शिस्त व न्यायप्रिय होत्या. जात - धर्म यापलीकडे जाऊन त्यांनी रयतेचा विचार केला. अठरापगड जातीतील मावळ्यांना सोबत घेऊन स्वराज्याची स्थापना करण्यासाठी शिवबांना त्यांनी मार्गदर्शन केले. जिजाऊंनी शिवबांची १८ व्या वर्षी पहिली परीक्षा घेतली. रांझाच्या पाटलाचे न्यायनिवाडाचे काम शिवबांकडे दिले. गावागावांतील तंटे-बखेडे शिवबांना सोबत घेऊन जिजाऊंनी मिटवले. राजमाता जिजाऊ स्वतः उत्तम न्यायाधीश होत्या. त्यांनी पुणे परगण्यात स्वतः अनेक न्यायनिवाडे केले आहेत. बालशिवबाला शेजारी बसवून सज्जनांचे रक्षण करणारा आणि दुर्जनांना जरब बसविणारा न्यायनिवाडा जिजाऊंनी शिकविला. जिजाऊंचे स्वतःचे गुप्तहेर खाते होते. त्याद्वारे स्वराज्यातील सर्व माहिती मिळवून शिवरायांना नेहमी मोहिमा आणि धोरणे ठरवताना मदत होत असे.


माँसाहेब जिजाऊंचा लढा हा अखंड मानव जातीसाठी, शोषकांच्या विरोधात शोषितांच्या स्वातंत्र्यासाठीचा लढा होता. स्वराज्याची अशी समतामुलक बीजे रोवण्याची आणि मानवतावादावर आधारित स्वराज्य निर्माण करण्याची प्रेरणा ही माॅसाहेब जिजाऊ यांची होती. शिवरायांच्या आयुष्यातील पन्नासपैकी पंचेचाळीस वर्षे त्यांच्यावर मायेची नजर ठेवणाऱ्या राजमाता म्हणजेच जिजाऊ. स्वराज्याचे सार्वभौमत्व, स्वराज्याला अधिमान्यता, प्रजेचे कल्याण, स्वातंत्र्य, स्वशासन, समता, न्याय, सहिष्णुता, सामाजिक सलोखा, जहागिरीची व्यवस्था, न्यायनिवाडा करण्याचे प्रशिक्षण आदी मूल्यांचा वारसा जिजाऊंनी शिवरायांना दिलेला आहे. हे आदर्श मातेचे उत्तम उदाहरण आहे. जिजाऊंनी केलेल्या संस्कारांमुळेच शिवाजी राजे घडले.

'छत्रपती शिवाजीराजांसारखा लोककल्याणकारी राजा घडविण्याचे ऐतिहासिक कार्य जिजाऊंनी केले.' आद्य शिवचरित्रकार कृष्णाजी अर्जुन केळुस्कर म्हणतात तर 'स्वराज्य स्थापनेची कल्पना आणि आरंभ याचे सर्व श्रेय केवळ जिजाबाई मातोश्रीस आणि शहाजीराजांस दिले पाहिजे', असे ज्येष्ठ इतिहास अभ्यासक वा. सी. बेंद्रे म्हणतात. २३ जानेवारी १६६४ रोजी शहाजी राजे भोसले यांचे निधन झाले. त्यांच्या पतीच्या निधनानंतर जिजाऊंनी हार मानली नाही किंवा खचल्या नाहीत. त्या जिद्दीने पुन्हा उभ्या राहिल्या. आखेर १७ जून १६७४ रोजी जिजाऊंची प्राणज्योत मावळली. राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ लखुजीराजे जाधव यांच्या वीरकन्या, शहाजीराजे भोसले यांची वीरपत्नी, उमाबाई साहेबांची आदर्श सून, शिवबांची आदर्श माता आणि रयतेच्या राजमाता होत्या. आज शिवरायांसारखे पराक्रमी, मानवतावादी नेते उदयाला येतील पण त्याअगोदर जिजाऊंसारख्या माता घरोघरी निर्माण झाल्या पाहिजेत. जिजाऊ मातांनी संभाजीराजेंनाही राजनीती, युद्धकलेचे शिक्षण दिले. पुत्राप्रमाणे नातवावर उत्तम संस्कार करणारी राजमाता जिजाऊ या खऱ्या अर्थाने स्वराज्याच्या प्रेरणापीठ, ज्ञानपीठ आणि विद्यापीठ आहेत.

आजच्या आमच्या मातांनी 'हिंदवी स्वराज्य संकल्पक राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ' यांचे विचार आणि संस्कार आत्मसात करावेत, हेच खऱ्या अर्थाने या राष्ट्रमातेसाठी आपल्याकडून अभिवादन ठरेल.



डॉ. प्रकाश खेत्री,
छत्रपती संभाजीनगर,
मो.न. ७८४३०९२२४४




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी


त्या मुलांना खायला मिळावं यासाठी हेलिकॉप्टरमधून खाद्यपदार्थांची पाकिटे टाकण्यात येत होती. इकडे या बालकांचा आयुष्याशी लढा सुरु होता. तशी तेरा वर्षांची लेस्ली लहानच ! पण आता ती सगळ्या भावंडांमध्ये मोठी होती. आपल्या लहान भावंडांचा सांभाळ करण्याची जबाबदारी नियतीनं तिच्यावरच टाकली होती. लेस्लीने धीर एकवटला आणि निश्चय केला की या परिस्थितीतही आपण आपल्या भावंडाना वाचवायचं. जगायचं आणि जगवायचं तर खाण्यासाठी काहीतरी व्यवस्था करणं भागच होती. सुरुवातीला विमानातून खाली पडलेल्या अन्नावर त्यांनी कसेबसे दिवस काढले. पाण्याचा शोध घेतला. जंगलातील फळे खाणे तसे धोक्याचे होते कारण काही फळे विषारीही असतात. पण लेस्ली जंगलकन्या होती. आदिवासी जमातीतील होती. जंगलात कसे राहायचे, आपला बचाव कसा करायचा, काय खायचे आणि काय खायचे नाही याचे ज्ञान तिला लहानपणापासून मिळाले होते. अवघ्या एक वर्षाच्या क्रिस्टीनालाही सांभाळण्याची जबाबदारी तिच्यावर होती. लेस्ली आणि तिची

## ते चाळीस दिवस. ..

भावंडे नियतीने घेतलेल्या कठोर परीक्षेत यशस्वी झाली. चाळीस दिवस या मुलांनी जीवनमरणाचा लढा दिला होता. कशी राहिली असतील ही मुलं ? त्यांनी काय खाल्लं असेल ? पाण्याची तहान त्यांनी कशी भागावली असेल ? केवळ एका वर्षाच्या बाळाला त्यांनी कसे सांभाळले असेल असे अनेक प्रश्न आपल्याला पडतात.( उगवतीचे रंग ) इकडे शोधपथकाचे कार्य सुरूच होतं. स्निफर डॉगसह १५० सैनिक या मुलांचा शोध घेत होते. अखेर त्यांना या मुलांच्या काही खाणाखुणा मिळायला सुरुवात झाली. एक दुधाची बाटली, डायपर, कात्री, केस बांधण्याची क्लिप आणि आणखी काही वस्तू मिळाल्या. मुलांच्या पायांचे ठसे आढळले. शोधपथकाच्या आशा पल्लवित झाल्या. त्यांनी आपल्या तपासाचा वेग वाढवला आणि त्यांच्या प्रयत्नांना यश आलं. चारही मुलं आश्चर्यकारकरित्या त्यांना जिवंत मिळाली. त्यांच्या आनंदाला पारावर राहिला नाही. कोलंबियाचे राष्ट्राध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनी ही आनंदवार्ता जाहीर केली. ते म्हणाले, ' इतक्या भीषण परिस्थितीतही ही




मुले चाळीस दिवस जिवंत राहिली, हे एखाद्या चमत्कारापेक्षा कमी नाही. ही मुले राष्ट्राचे भूषण आहेत. ' या मुलांना त्यांना चिल्ड्रन ऑफ कोलंबिया म्हणून जाहीर केले. अत्यंत विपरीत परिस्थितीत राहिल्यामुळे ही मुले कमालीची अशक्त आणि आजारी झाली होती.



## आनंदी पहाट

## वर्तमानातील व वर्तनातील आनंद महत्त्वाचा

आधुनिक केसरी

आपल्या आयुष्यातील गेलेल्या क्षणांना आपण कितीही ठरवलं तरीही विसरू शकत नाही. त्या गतकाळातील आठवणींचा प्रत्येक क्षण आपल्याला काहीवेळा नवी उभारी देत असतो, तर काहीवेळा नैराश्यात देखील घेऊन जात असतो. भूतकाळात घडलेल्या प्रत्येक घटनेचा, घडामोडीचा संबंध आपण आपल्या वर्तमानातील जीवनाशी जोडण्याचा केविलवाणा प्रयत्न नेहमीच करत असतो. जो गेला तो भूतकाळ होता, त्यांत किती गुरफटून राहायचं, ह्याचं कित्येकवेळा आपल्याला भानच रहात नाही. तो काळ आपण कितीही ठरवला, तरीही विसरूच शकत नाही. खरं म्हणजे भूतकाळात रममाण होण्यापेक्षा वर्तमानातील परिस्थिनुसार भविष्य उज्वल करण्याचा आपण प्रामुख्यानं आणि प्राधान्यानं विचार केला पाहिजे. आपण अनेकदा भूतकाळातून अंतर्मनानं बाहेर पडत नाही आणि वर्तमानातील आनंद मिळवू शकत नाही, केवळ आपल्या नशिबाला आणि भविष्याला दोष देत बसतो. आपल्या आयुष्यात अथवा इतरत्र काय घडलंय, हे आपल्याला माहिती असतंच किंवा ते कालांतरानं माहिती होतंच. कालची, भूतकाळातील माहिती आपल्या सर्वांनाच उपलब्ध होत असते. वर्तमानात राहून भूतकाळातल्या अनुभवांबरोबर सतत राहणं हे नेहमीच उपयोगाचं ठरतं असं नाही. प्राप्त परिस्थितीत काहीवेळा उपलब्ध झालेल्या अनेक चांगल्या संधी आपण गमावू शकतो. ह्याचं नुसतं ज्ञान असून चालत नाही, तर त्या संधीचं सोनं करण्याचं भान आपल्याला असणं आवश्यक असतं. अनेकदा आपल्या गत आयुष्यातील अनेक बाबींची सांगड, बरोबरी, तुलना आपण प्राप्त आणि सद्यःस्थितीशी करत असतो. काहीवेळा नकारात्मक विचार आपल्या अंतर्मनांत थैमान घालायला लागतात आणि भ्रमातले आपण संभ्रमांत जखडून राहतो. चांगलं-वाईट, चूक-बरोबर, खरं-खोटं अशा अनेक समस्या आपल्याला भेडसावत राहतात. अशावेळी, आनंद तर नाहीच पण दु:ख, निराशा पदरी येते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### ब्रह्म सुख अहोरात्र ||

निरंतर जाग जिवा |
विकारांचा हा चकवा ||१||
सुख-दुःख नको भेद |
मायावी हा असे नाद ||२||
वागे प्रसंगावधाने |
जाणले सुख तयाने ||३||
वादावाद टाळ मना |
मौने स्विकार साधना ||४||
हरि भजनी रमावे |
आत्ममग्न सदा राहावे ||५||
संतसंग ज्याचे गोत्र | ब्रह्म सुख अहोरात्र ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण


आधुनिक केसरी

ऐसा दुस्तर संसार ।करितां कष्टला थोर ।
पुढें दोनी च्यारी संवत्सर ।द्रव्य मेळविलें ॥२॥
सवेंचि आला देशासी ।तों आवर्षण पडिलें देसीं ।
तेणें गुणें मनुष्यांसी ।बहुत कष्ट जाले ॥३॥
येकांच्या बैसल्या अमृतकळा ।येकांस चंद्री लागली डोळां ।
येकें कांपती चळचळा ।दैन्यवाणीं ॥४॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

मान परम बन्धन हवै,
सच विरक्त नहिं चाह ।
होवै जनु विष्ठा लगै, घृणित होय उरदाह
।।१३२।।(स्वर्वेद षष्ठ मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/१३२

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
साधकांसाठी मान-प्रतिष्ठा हे सर्वात मोठे बंधन आहे. खऱ्या विरक्तांना ते नको असते. प्रतिष्ठा मिळाल्यावर त्यांना ह्दयात वेदना होतात. मल किंवा विष्ठा लागल्यावर जशी घृणा येते, तसा प्रतिष्ठा मिळाल्यावर त्यांचा भाव होतो. म्हणून साधकाने जगातील मान - प्रतिष्ठेपासून दूर राहून प्रभूभक्ती भजन- साधनारत रहावे.


स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.

## ब्रम्हज्ञान

आधुनिक केसरी

अनुभवाचे लक्षण अनुभव म्हणजे स्वरूपाशी अनन्यपणा होय. अनन्यपणाचे लक्षण अन्य नाही ते अनन्य. जेथे दोन पण, दुसरे पण, निराळे पण,वेगळेपण, तुझं माझं असा परकेपणा नसतो ,तेथे अनन्यपण असते. उदा,आत्मनिवेदन,अहंतेने किंवा दुसरे पणाने किंवा अनन्यपण येते. अहंता गेली की संग गेला कारण दुसरा कोणी असल्याखेरीज संग जगू शकत नाही. म्हणून अहंता गेली की आत्मा एकच एक आत्मपणाने जसाच्या तसाच उरतो. मी आधी पण म्हणाले होते की संत वचनावर विश्वास ठेऊन आपली अध्यात्मिक प्रगती करणे आपल्या हातात आहे. मित्रांनो तेच विचार समर्थ आपल्याला वेळोवेळी सांगत आहेत.कसे ते बघा. "मी आत्मा आहे" अशी आत्मपणाने जाणीव आत्मस्वरूपात नसते.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## संस्कारकर्मांचा मूळ हेतू

आधुनिक केसरी

धार्मिक संस्कार फार चांगले असतात, कारण त्यांनी आपल्या मनाला वळण लागते. प्रत्येक धर्मामध्ये संस्कार असतातच. ज्या मनुष्याला संस्कार नाही तो कोणत्याच धर्माचा नाही; मग तो आस्तिक असो वा नास्तिक असो. खरे म्हणजे कोणतेच कर्म यथासांग घडत नसते; पण त्यातल्या त्यात, संस्कारकर्म मनुष्याने शास्त्राप्रमाणे करावे. त्यामध्ये जिथे कमी पडेल तिथे भगवंताचे स्मरण करावे, कारण भगवंताची श्रद्धा वाढावी हाच संस्काराचा मूळ हेतू आहे. संस्कार करीत असताना जरूर असलेला धार्मिक विधी तर करावाच, पण ज्यांना आपल्याविषयी प्रेम आहे असे, आणि आपल्याला ज्यांच्याविषयी प्रेम आहे असे जे लोक आहेत, त्यांना जेवायला बोलवावे. लौकिक मात्र वाढवू नये. वाईट ते सोडणे आणि चांगले ते धरणे हाच संस्काराचा मुख्य हेतू. संस्कार हे भगवंताचे स्मरण करून देतात. समाज हा बंधनाशिवाय राहूच शकत नाही. ' आम्हांला बंधने नकोत ' असे म्हणणारे लोक वेडे आहेत. बंधनांमुळेच आपल्या धर्माला



सनातनत्व आले आहे. म्हणून बंधनांना अतिशय महत्त्व आहे. धर्म हा कधीच बुडत नसून बंधने बुडत जातात. सध्या बंधने बुडत चालली आहेत. पूर्वी धर्मावर श्रद्धा होती, म्हणून इतक्या सुधारणा नसूनसुद्धा स्वास्थ्य होते. पण आज बाहेरच्या जगात पुष्कळ सुधारणा झाल्या तरी त्या सुधारणांना धर्माचा पाया नसल्यामुळे मानवाला स्वास्थ्य नाही. अलीकडे काही लोक असे म्हणतात की, समाज जसा बदलेल तसे नीतीचे नियम बदलायला पाहिजेत. पण अध्यात्मविद्या असे सांगते की, नीतीचे नियम कायमच आहेत. ते न बदलता माणसाने स्वतःलाच बदलले पाहिजे. एखाद्या समाजाचा पाया बौद्धिक असू शकेल किंवा पैसा असेल; पण ज्या समाजाचा पाया धर्म आहे त्या समाजालाच खरे समाधान लाभेल. धर्म म्हणजे एका अर्थाने व्यवस्थितपणाच होय. धर्म वस्तुजाताला संस्काराच्या रूपाने नीट धरून ठेवतो. व्यवहारामध्ये ज्याचा उपयोग करता येतो तोच खरा वेदांत होय; आणि जो परमार्थाला उपयोगी पडतो तोच खरा आणि योग्य व्यवहार होय. भगवंत आम्हाला हवा आहे असे म्हटले, तरी जग आमच्या आड येत आहे असे आम्हाला वाटते. जग आडवे का येते, तर जगाशी आमचे स्वार्थाचे संबंध आहेत म्हणून. जगाशी वागताना आम्हाला निःस्वार्थीपणाने व्यवहार करण्याची सवय नसल्याने जगाचा मोह आम्हाला सुटत नाही. हे सर्व नाहीसे होण्यासाठी आम्ही निःस्वार्थी बनणे खरोखर आवश्यक आहे. त्यासाठी आम्हाला आमचे मन ताब्यात ठेवता आले पाहिजे, आणि त्याकरिता नाम हेच साधन आहे. जन्माला येऊन काही करणे असेल तर भगवंताला न विसरता कर्मे करावी, म्हणजे झाले.

## गहिनीनाथ

आधुनिक केसरी

हा पुढे कसा होईल हे मातोश्री, मी तुला आता काय सांगू? पण याचे सेवेसाठी मूर्तिमंत कैलासपति उतरेल. ज्याचे नाव निवृत्ति असेल त्यास हा अनुग्रह करील. याचे नाव गहिनीनाथ असे ठेव. आम्ही तीर्थयात्रेस जातो. पुन्हा बारा वर्षांनी हा आमचा बाळ गोरक्षनाथ येथे येईल, तेव्हा तो ह्यास अनुग्रह करील. मग मोहनास्त्र मंत्र म्हणून विभूति तिचे अंगावर टाकताच, तिच्या स्तनात दूध उत्पन्न झाले. मग मुलास स्तनपान करविल्यानंतर तिने गावातील सुवासिनी बोलावून मुलास पाळण्यात घालून गहिनीनाथ असे त्याचे नाव ठेविले. पुढे मच्छिंद्रनाथ काही दिवस तेथे राहिला व गावकऱ्यांची रजा घेऊन गोरक्षासहवर्तमान तो तीर्थयात्रेस गेला. जाताना गोरक्ष अजून कच्चा आहे असे मच्छिंद्रनाथास दिसून आले. मग त्यास बदरिकेद्वार स्वामींच्या हवाली करून तपास लावावे असे मनात जाणून अनेक तीर्थयात्रा करीत करीत ते बदरिकाश्रमास गेले. मच्छिंद्रनाथास सोन्याच्या विटेचा मोह, समाराधना, गहिनीनाथास गोरक्षाचा उपदेश मच्छिंद्र व **क्रमशः**



शुक्रवार, १२ जानेवारी २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १४८
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) FRIDAY 12 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-148 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05




# खंडोबाच्या जेजुरीत गर्जला जय श्रीरामचा जयघोष

## मंगल कलश शोभायात्रेत शेकडोंचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**जेजुरी : शैव आणि वैष्णवाचे माध्यमिक स्वरूप असलेल्या मल्हारी मार्तंड नगरीत भगवन्त श्रीराम मंगल कलश शोभा यात्रेत शेकडो राम भक्तांनी श्री रामाचा जय घोष केला. जय श्रीराम गर्जनाने आवाघी धूमधूमली खंडोबानगरी, विश्व हिंदू परिषद आणि सकल हिंदू समाजाच्या वतीने या शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी डोक्यावर मंगल कळस घेवून श्री रामाचा रथ,तसेच पालखीत मंगल कलश ठेवून ही शोभा यात्रा काढण्यात आली होती.**

या शोभा यात्रा वेळी जेजुरी शहरात घराघरासमोर सडा रांगोळी, फुलांची पायघडी घालून फुलांची उधळण करीत जेजुरीकरांनी शोभायात्रेचे स्वागत केले. यापूर्वी महाराष्ट्राचे कुलदैवत खंडोबा देवाचे कडेपठार मंदिर, तसेच जेजुरी गड,श्रीराम मंदिर,ग्रामदैवता जाणाईदेवी मंदिरामध्ये मंगल कलशाचे पूजन करून नागरिक आणि भाविकांना दर्शनासाठी ठेवण्यात आला होता. आज जाणाई देवी मंदिरातून ही शोभा यात्रा काढण्यात आली. जेजुरी शहरातून फुलांची उधळण, फटाक्यांची आतषबाजी करून या शोभा यात्रेचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. या शोभा यात्रेत सकल हिंदू समाज व मोठ्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या.

# माजी उपसभापती सुरेशभाऊ बिल्लेवाड यांचा शिवसेनेत प्रवेश

## काँग्रेसला सोडचिठ्ठी : राजकीय समीकरण बदलणार

आधुनिक केसरी न्यूज



मागील अनेक वर्षापासून तालुक्यात राजकीय व सामाजिक हितासाठी लढा सुरू आहे .दरम्यान राजकीय क्षेत्रात संधी मिळाल्याने माझ्या कार्याला आणखी ऊभारी मिळाली .कॉग्रेस पक्षात काम करताना काहि मंडळींकडून मला सतत डावळण्याचा प्रयत्न झाला . त्याच्या कारभाराला कंटाळून मी शिवसेनेत प्रवेश केला आहे .भविष्यात पक्षास आणि जनतेच्या हितासाठी प्रयत्न राहील .
**( माजी उपसभापती सूरेशभाऊ बिल्लेवाड, भोकर )**

**भोकर :** येथील पंचायत समितीचे काँग्रेस पक्षाचे माजी उपसभापती सुरेशभाऊ बिल्लेवाड यांचा बुधवारी (ता.१०) बाळापूर येथील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याच्या उपस्थितीत झालेल्या शिवसंकल्प मेळाव्यात काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देऊन शिवसेनेत प्रवेश केला आहे. यामुळे तालुक्यातील राजकीय समीकरण बदलणार. भोकर विधानसभा मतदारसंघ हा माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा मतदारसंघ असुन तालुक्यात काँग्रेस पक्षाचे प्राबल्य आहे. तालुक्यातील बिल्लेवाड हे राजकीय व सामाजिक क्षेत्रात परिचीत आहेत.२०१७ झालेल्या पंचायत समितीच्या निवडणुकीत अपक्ष म्हणून ते विजयी झाले त्यावेळी काँग्रेस पक्षाला सत्ता स्थापन करण्यासाठी एका सदस्याची नितांत गरज होती. अशा बिकट समयी त्यांनी काँग्रेसला पाठिंबा दिल्याने त्याची उपसभापती म्हणून वर्णी लागली.कालातंराने त्यानी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.दरम्यानच्या काळात चव्हाणाच्या अवती भोवती असलेल्या नेत्यांकडून सवतीची वागणुक मिळाल्याने ते नाराज" होते.याच कारणांमुळे त्यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देऊन बुधवारी बाळापूर येथे झालेल्या शिवसेनेच्या शिवसंकल्प मेळाव्यात मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे.यावेळी खासदार हेमंत पाटील, आमदार संतोष बांगर, आमदार बालाजी कल्याणकर, मराठवाडा संपर्क प्रमुख आनंद जाधव, जिल्हा संपर्क प्रमुख सिध्दार्थ दूधवडकर, जिल्हा प्रप्रुख आनंद बोंडारकर, ऊमेश मूंडे, संतोष कपाटे (अर्धापूर तालुका प्रमुख), विकास देशमुख यांची उपस्थिती होती.






# पत्रकार संघातर्फे पत्रकार दिनानिमित्त बल्लारपूरच्या नवरत्नांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**प्रेम गेहलोत**

**बल्लारपूर :** चंदनसिंह चंदेल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमाला बल्लारपूर पेपर मिल ग्राफिक्सचे एचआर अजय दुरटकर, बल्लारशाह वन परिक्षेत्र अधिकारी नरेश भोवरे, ज्येष्ठ पत्रकार वसंतराव खेडेकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेंद्र ठाकरे, प्रा.डॉ.विजय सोरटे, भाजप शहराध्यक्ष म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे काशिनाथ सिंग, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष मुन्ना खेडकर व्यासपीठावर उपस्थित होते.
पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बाळशास्त्री जांभेकर, दिवंगत मधुकर रणदिवे, दिवंगत सुरेश रामगुंडे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. दरवर्षी प्रमाणे या वर्षीही सामाजिक क्षेत्रात शहराचा गौरव करण्यात आला. वैद्यकीय, शासन, क्रीडा, कला आणि शिक्षण या क्षेत्रात भरीव कार्य केलेल्या व्यक्तींचा पत्रकार संघातर्फे गौरव करण्यात आला आहे, यावर्षी बल्लारपूरचे सुप्रसिद्ध आयुर्वेदिक वैद्य, तहसील बार असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र आर्य, अधिवक्ता आय.आर. सय्यद, अभिनेते मंगेश रेगुंडवार, पत्रकार अनिल पांडे, प्राणिसंरक्षक श्रुती लोणारे, सामाजिक कार्यकर्ते श्रीकांत आंबेकर, सुवर्णपदक विजेत्या अधिवक्ता रोहिणी सुरपाम, आदर्श सतीश मिश्रा, बुद्धिबळ स्पर्धेतील विदर्भ सुवर्णपदक विजेता साहिल गोरघाटे, अधिवक्ता प्रियंका चौहान, नगरपालिकेचे सदस्य डॉ. संघ रंगय्या अडुवार इत्यादींना नऊ रत्न कलागौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.
या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाराष्ट्र पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष रमेश निषाद, तहसील अध्यक्ष अजय रासेकर, सचिव परिष मेश्राम, कोषाध्यक्ष देवेंद्र झाडे व सहयोगी विशाल डुंबरे, धनंजय पांढरे आदींनी परिश्रम घेतले. या आयोजित कार्यक्रमात नारदप्रसाद ठाकूर, मंगेश बेले, तनशील पठाण, उमेश तपासे, श्रीनिवास उन्नवा, मनीष तावडे, समीर केणे, मनीष पांडे, मेघनाथ सिंग, हेमंत मानकर, रमेश गुप्ता, प्रकाश दोतापेल्ली, सतीश कनकम, सतीश मिश्रा, अश्विन कुलमे यांनी सहभाग घेतला. पत्रकार दिन., प्रमोद गेहलोत, सरिता मालू, सीमा वनकर, झेहरा थारिया, मीना झोया, हनिषा दुधे, मीनाक्षी गलगट, सुजय वाघमारे, मनोहर डॉटपेल्ली, दीपक भगत, वसंत मुन, राजू राठोड, आदी उपस्थित होते, त्याचप्रमाणे सरिता, संचालक डॉ. फ्रेंड्स चॅरिटी ग्रुप चंद्रपूर.मालू यांनी पत्रकार दिनानिमित्त पत्रकार रमेश निषाद, नारदप्रसाद ठाकूर, परिष मेश्राम, मुन्ना खेडेकर यांचा पुष्पगुच्छ व शिल्ड देऊन गौरव करण्यात आला.




## नार्वेकरांचे स्पष्टीकरण

आधुनिक केसरी

महाराष्ट्राची महासुनावणी बुधवारी पार पडली. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवसेनेतील फुटीनंतर आमदारांची अपात्रता आणि शिवसेना कुणाची यावर निर्णय दिला. यासाठी त्यांनी शिवसेनेची १९९९ ची घटना, पदरचना आणि निवडणूक आयोगाने दिलेला निकाल या गोष्टी विचारात घेतल्या होत्या. राहुल नार्वेकर यांनी खरी शिवसेना एकनाथ शिंदेंचीच आहे, असे म्हटले आहे. त्यानंतर त्यांच्यावर उद्धव ठाकरे, ठाकरे गट आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून टीका केली जाते आहे. त्याबाबत आता नार्वेकर यांनी भूमिका मांडली आहे. निकाल देण्यासाठी कालमर्यादा होती त्यामुळे १४ ते १५ तास मला यावर काम करावे लागले. कमीत कमी वेळेत हा गुंतागुंतीचा विषय माझ्यावर होती. हा खटला माझ्यासमोर प्रलंबित होता. यातली न्यायिक प्रक्रिया पूर्ण करुन, कायदेशीर तरतुदींचे पालन करुन कुठलीही चूक न करता निर्णय घेण्याचा प्रयत्न मी केला, असे राहुल नार्वेकर यांनी म्हटले आहे. राहुल नार्वेकर यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत हे स्पष्टीकरण दिले आहे. सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाची मार्गदर्शक तत्त्व ठरवून दिली आहेत. पहिल्यांदाच अध्यक्षांना राजकीय पक्ष कोणता हे ठरवण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाने अध्यक्षांना दिला. तसंच राजकीय पक्ष कसा ठरवायचा? याचेही निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले. हे ठरवत असताना पक्षाचे संविधान, त्या पक्षाची पदनामावली आणि आमदारांची संख्या कुणाबरोबर किती आहे याचा विचार करावा या तीन निकषांचा विचार करुन निर्णय घेण्याचे आदेश दिले. त्यामुळेच मी मूळ राजकीय पक्ष कोण? हे ठरवले. त्यानंतर कुणाचा व्हीप लागू होतो हे सांगितले. मी जो निर्णय दिला त्यावेळी शिवसेनेच्या संविधानाचा उपयोग केला. १९९९ की २०१८ चे शिवसेनेचे संविधान ग्राह्य धरायचे हा प्रश्न होता. सर्वोच्च न्यायालयाने त्याबाबत सांगितले की निवडणूक आयोगाने ग्राह्य धरलेले संविधानच ग्राह्य धरावं त्यानुसार निर्णय केला असे राहुल नार्वेकर यांनी म्हटले आहे. उद्धव ठाकरे गटाने ज्या पत्राचा आधार घेऊन युक्तिवाद केला ते पत्र मी नीट वाचले. त्यात संविधानात दुरुस्तीचा उल्लेखच केला नव्हता. त्यात इतकेच म्हटले होते, की शिवसेना पक्षात निवडणूक झाली आहे. त्याची माहिती निवडणूक आयोगाला दिली आहे. मात्र घटनेतील दुरुस्तीचा उल्लेख केला गेला नव्हता असेही राहुल नार्वेकर म्हणाले आहेत. विधानसभेच्या नियम क्रमांक ३ मध्ये तरतूद आहे की पक्ष निवडून आल्यानंतर पक्षाच्या अध्यक्षांनी तीस दिवसांच्या आत पक्षाचे संविधान, पदांची माहिती ही विधानसभा अध्यक्षांना कळवायची असते. पण या प्रकरणात उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी काहीही कळवले नाही.

## युगनिर्मात्या आईसाहेब आणि प्रज्ञावंत सुपुत्र !



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**एका महान मातेची आणि एका देदीप्यमान सुपुत्राची आज जयंती! युगनिर्मात्या आईसाहेब जिजाऊ आणि प्रज्ञावंत सुपुत्र स्वामी विवेकानंद या दोन्ही महान विभूतींना जयंती निमित्त शत शत नमन! हा अतिशय आनंददायी योग आज जुळून येतांना संपूर्ण भारतासाठी निश्चितच हा गौरवपूर्ण दिवस! सतराव्या शतकात जन्मलेल्या जिजाऊ आईसाहेब ह्या इतिहासातील सुवर्णपान आहेत तर त्यांच्या नंतर एकोणिसाव्या शतकात जन्मलेले स्वामी विवेकानंद हे तर्कशास्त्र-तत्वज्ञान याचं आढळ अधिष्ठान आहेत. एका मातेनं आपल्या शूरवीर विचारांनी रयतेचे राज्य स्थापन करतांना छत्रपती शिवाजी महाराजांसारखं नररत्न घडवलं तर स्वामीजींनी जगभर फिरून भारतीय मुलभूत तत्वज्ञानाची ओळख संपूर्ण जगाला करून दिली.**

आज एकाच दिवशी एका महान माता-सुपुत्रांचा गौरव ही आम्हा भारतीयांसाठी मोठी अभिमानाची गोष्ट! मातेच्या दैदिप्यमान कर्तृत्वाने आणि सुसंस्कारित पालन पोषणाच्या बळावर अनेकविध सुपुत्रांनी आकाशाला गवसणी घालण्याचे भव्य-दिव्य कार्य केल्याचा इतिहास सर्वसाक्षी आहे! छत्रपती शिवबांसारखे पुत्ररत्न घडवून आपल्या सर्वांगीण संस्काराने ज्या मातेने स्वबळावर रयतेचे साम्राज्य उभे केले अशा राष्ट्रमाता जिजाऊ आईसाहेब यांचा इतिहास सुद्धा तेवढाच भव्य-दिव्य आहे! बालवयात वेरुळच्या भोसले घराण्यातील शहाजीराजे भोसले यांच्याशी त्यांचा विवाह झाला. संघर्ष जिजाऊंच्या पाचवीलाच पुजला होता. जाधव-भोसले यांच्यात बेबनाव झाला. दुर्दैवाने दोन्ही घरात प्रचंड वितुष्ट आले, परिणामी जिजाऊंचे माहेर कायमचे तुटले, परंतु न डगमगता त्यांनी शहाजीराजे भोसले यांचा संसार उजळवून टाकला. जिजाऊंसमोर अनंत अडचणींचे पहाड उभे होते. त्यातच शहाजी राजांना पुणे परगणा सोडून बंगळूरूला जावे लागले. जेष्ठ पुत्र संभाजींनी आपल्या वडिलांना भक्कम साथ दिली तर इकडे जिजाऊंनी शिवबांना मजबूत-तल्लख बनवले. मुघलशाही-कुतुबशाही-आदिलशाही-निजामशाही या बलाढ्य शाह्यांशी चार हात करण्याचे शारीरिक-मानसिक सामर्थ्य शिवबामध्ये निर्माण केले. काळ मोठा खडतर होता. गाढवांचा नांगर फिरलेल्या पुण्याच्या भूमीत अठरापगड जातीतील मावळ्यांच्या साथीने सोन्याचा नांगर फिरविण्याचे महत्कार्य आईसाहेबांनी केले! शूर-धाडसी-पराक्रमी मातेचे बाळकडू लाभलेल्या शिवबांनी वयाच्या सोळाव्या वर्षी तोरणा किल्ला काबीज करून स्वराज्याचे तोरण बांधले आणि नंतर मागे वळून पहिलेच नाही! एकावर एक आक्रमणे, शह-काटशहांनी जीवन व्यस्त-त्रस्त होत असतांना शिवबांच्या पाठीशी त्या खंबीरपणे उभे राहिल्या! युद्ध आणि व्यवहारकुशलतेने सूक्ष्म निरीक्षण-परीक्षण-मार्गदर्शन करण्याचे महत्वपूर्ण कार्य मांसाहेबांनी केले. विजापुर-मुघलसाम्राज्याशी संघर्ष, अफजलखान प्रकरण, पन्हाळगडचा वेढा, पावनखिंड लढाई, शाहिस्तेखान प्रकरण, सुरतची लुट, पुरंदरचा तह, आग्रा प्रकरण,





मुघलांसोबत तह, उमराणी-नेसरीची लढाई आणि छत्रपती शिवबांचा राज्याभिषेक या सर्वच घटना सर्वसामान्यांचे डोळे दिपवून टाकणाऱ्या आहेत आणि या पाठीमागे खंबीर मार्गदर्शन कुणाचे असेल? तर ते मातोश्री जिजाऊंचे! जिजाऊंनी केवळ स्वराज्यच उभे केले नाही तर आपल्या मुलांमध्ये प्रचंड आत्मविश्वास आणि संघर्ष करण्याची जिद्द निर्माण केली! छत्रपती शिवबांनी केलेले कार्य हे केवळ शक्तीचे कार्य नसून त्यामागे प्रचंड बुद्धिचातुर्य होते हे लक्षात घ्यावे लागेल. जात-धर्म-पंथ याचा संकुचित विचार कधी कुणाला शिवला नाही. सामान्यातील सामान्य आणि शिवबा समान मानून स्वराज्याची बांधणी माता जिजाऊंनी मोठ्या धीरोदत्तपणे केली आणि घराघरांत जाज्वल्य आत्मविश्वास पेरण्याचे महत्कार्य केले! याचाच परिणाम म्हणजे लोक स्वराज्यासाठी स्वतःचा जीव द्यायला तयार झाले! जीवा महाला, शिवा काशिदांसारख्या अनेकांनी हसत बलिदान दिले आणि त्यावर 'बहुजन हिताय' शिवबांनी आपल्या राजमुद्रेसह रयतेचे मराठी स्वराज्य संस्थापित केले!
तसेच आज एक दैदिप्यमान व्यक्तिमत्व, तेजोमय ब्रह्मचर्य, अमोघ वाणी आणि ज्ञान-ध्यान-साधनेने ओतप्रोत लेखणीच्या सामर्थ्यावर जगाला आपली ओळख निर्माण करणारे नरेंद्र नाथ दत्त म्हणजेच स्वामी विवेकानंद जयंती म्हणजेच राष्ट्रीय युवक दिन! त्यांनी शिकागो जागतिक धर्मपरिषदेत "बंधू-भगिनींनो" शब्दांनी संपूर्ण जगाला भारताच्या "वसुधैव कुटुंबकम" तत्वाची ओळख करून दिली. जेमतेम ३९ वर्ष आयुष्य लाभलेले स्वामीजी म्हणजे "ते चालते ज्ञानाचे बिंब | तयाचे अवयव ते सुखाचे कोंब"! रामकृष्ण परमहंस यांच्या गुरुतत्व स्पर्शाने स्वामीजी अध्यात्मिक-वेदांत दर्शनाने ओतप्रोत व्यक्तिमत्व बनले! नैष्ठिक ब्रह्मचर्य, बलोपासना, ज्ञानसाधना, ध्यान धारणा, आत्मसन्मान, आत्मभान, आत्मविश्वास या सद्गुणांच्या बळावर मनुष्य आकाशाला गवसणी घालू शकतो हे सिद्ध केले. धार्मिक अवडंबर, ब्राह्मण्यवाद, पुरोहीतवाद, धर्माचे बीभत्स प्रदर्शन याला परखड विरोध करतांना "ईश्वर मंदिरात नसून तो माणसामाणसात आहे ही वृत्ती म्हणजेच खरा हिंदू धर्म होय!" असे स्वामीजी प्रतिपादन करत. स्वामीजींनी अजीवन युवकांना प्रेरित केले! "उठा, जागे व्हा. स्वतः उठा आणि इतरांना उठवा. मनुष्यजन्म सुफळ करा आणि आपले ध्येय्य साध्य होईपर्यंत थांबू नका!" हे स्वामीजींचे शब्द म्हणजे तरुणांपासून ते शंभर वर्षाच्या माणसाने जीवनात अंगिकारण्यासारखे आहेत! युवकांमध्ये नित्य स्फुल्लिंग चेतविण्याचे महत्कार्य स्वामीजींनी केले. बलदंड देहयष्टी, दैदिप्यमान-विद्वत्प्रचुर व्यक्तिमत्व, अंगावर भगवे वस्त्र, फेटा परिधान केलेले स्वामीजी म्हणजे दिव्यत्वाची प्रतीती! अल्पायुष्यात जगभर व्याख्याने, प्रचंड लेखन यातून "अध्यात्म-विद्या और भारतीय दर्शन के बिना विश्व अनाथ हो जायेगा" असे प्रतिपादन करून स्वामीजींनी भारताच्या ज्ञान समृद्धीला झळाळी दिली. स्वामी विवेकानंद केवळ संत नव्हते तर ते एक महान देशभक्त, विचारवंत, वक्ता, लेखक आणि मानवप्रेमी व्यक्तिमत्व होते! "शिक्षण म्हणजे ज्यातून विद्यार्थी शारीरिक, मानसिक आणि आत्मिक विकसित झाला पाहिजे. शिक्षणातून चरित्र-चारित्र्य घडले पाहिजे. मन-बुद्धी विकसित होऊन विद्यार्थी आत्मनिर्भर बनला पाहिजे. आचरण-संस्कारसंपन्न शिक्षण गरजेचे आहे. शिक्षक-विद्यार्थी संबंध दृढ असावे. शिक्षक अत्यंत महत्वपूर्ण घटक असून तो आनंदी-सहिष्णू-प्रज्ञावंत-निर्व्यसनी असावा, त्याचा चुंबकीय प्रभाव आपल्या विद्यार्थ्यांवर नित्य राहील. देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी तंत्रशिक्षण आवश्यक आहे. शिक्षणातून जीवनात संघर्ष करण्याची वृत्ती जोपासली जावी." असे मौलिक विचार स्वामीजींनी प्रतिपादन केले. संपूर्ण जीवन केवळ आणि केवळ देशोत्थानासाठी अर्पण केले. स्वामीजींचे जीवन सर्वांसाठी आदर्श, नित्य मार्गदर्शक आहे! आज एका मातेची आणि सुपुत्राची जयंती साजरी करतांना केवळ पुष्पहार घालून, वंदन करून चालणार नाही. आजही काळ तेव्हढाच खडतर आहे! नवनवी आव्हाने आपल्यासमोर आ वासून उभी आहेत. पैशापायी माणूस आपले सर्वस्व हरवून बसला आहे. आज शांत झोप लागत नाही! मोबाईल नावाच्या राक्षसाने घरदार गिळंकृत केलेय! गर्दीत सुद्धा माणूस वेड्यासारखा त्या डबड्यासोबत खेळतोय! एकटाच हसतोय! सगळीकडे वेडेच वेडे! हे चित्र महाभयंकर आहे! तेंव्हा आपल्या आदर्शांच्या जयंतीदिनी आपल्याला काहीतरी संकल्प करावे लागतील. मोबाईलपासून दूर राहून घराघरांत ग्रंथ वाचन करावे लागेल. सकाळ-सायंकाळ मोबाईल बंद ठेवून विश्वशांतीसाठी प्रार्थना म्हणावी लागेल! निरोगी-आनंदी जीवनासाठी सर्वांनाच व्यायाम-योगा-प्राणायाम-ध्यान करावेच लागेल! मोबाईल ऐवजी मैदानावर खेळ खेळावे लागतील. मूल्य शिक्षण घराघरांत रुजवावे लागेल. माणसामाणसात सुसंवाद वाढवावा लागेल. असे झाल्यास घराघरांत जिजाऊ आणि त्यानंतर शिवराय आणि स्वामी विवेकानंद यांच्यासारखे सुपुत्र जन्माला येतील, अन्यथा आणखी एक जयंतीचा इव्हेंट, बस्स!

## स्वराज्याची प्रेरणा-राजमाता जिजाऊ



सुशील गायकवाड
संपर्क क्र.: 9309474068

आधुनिक केसरी

**अठरापगड जातींना सोबत घेऊन महाराष्ट्रात स्वराज्याची निर्मिती करणारे बहुजनप्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासाठी स्वराज्याची प्रेरणा ठरलेल्या राजमाता जिजाऊ होत.स्वराज्य म्हणजे स्वतःचे राज्य आणि या राज्यात प्रजा ही आनंदाने, सुखाने जगली पाहिजे.यासाठीचा लढा राजमाता जिजाऊ यांच्या प्रेरणेतून साकार झाला.लहानपणापासून ते स्वराज्याची उभारणी करण्यापर्यंत राजमाता जिजाऊ या छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासाठी उत्तम मार्गदर्शक म्हणून ठरल्या.छत्रपती शिवाजी महाराज यांच्यामध्ये विविध लढाऊ वृत्तीचे तसेच लोकहिताच्या दृष्टीने पाऊल टाकणारे, अन्यायी आणि जुलमी व्यवस्थेविरुद्ध आवाज उठविणारे निर्भिड व्यक्तीमत्व घडविण्यासाठी विशेष प्रयत्न केले गेले.**

शिवबाचे लहानपण, त्याच्या संगोपनाची जबाबदारी तसेच राज्य कारभाराचे धडे शिकविण्यासाठी स्वतः राजमाता जिजाऊ खंबीर पणे कार्यरत होत्या.१२ जानेवारी हा राजमाता जिजाऊ यांचा जयंतीदिन त्यानिमित्त त्यांना अभिवादन करताना त्यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेले स्वराज्य आजही तितकेच प्रेरक आणि दिशादर्शक असेच ठरते आहे. राजमाता जिजाऊ या सिंदखेडचा राजा लखुजीराव जाधव यांच्या कन्या होत.१२ जानेवारी इ स १५९८ रोजी त्यांचा जन्म झाला.लखुजीराव जाधव यांनी जिजाऊंना राजनीती व युद्ध कलेचे शिक्षण दिले होते.तेच शिक्षण जिजाऊंनी लग्न झाल्यानंतर पुत्र शिवबालाच नव्हे नातवाला म्हणजे संभाजी राजांनाही देण्यासाठी उपयुक्त असेच ठरले होते. दोघांमध्ये स्वराज्याला टिकविण्यासाठीचा लढा दिसून आला.त्याच जिजाऊंचा आजही जय जयकार होत असतो.बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा या ठिकाणी जिजाऊंचा जन्मोत्सव दिन मोठ्या उत्साहात संपन्न होत असतो.देवगिरीच्या यादव घराण्याचे वंशज म्हणून जाधवांकडे पाहिले जात असे. जाधवांची लेक जिजाबाई आणि भोसल्यांचे पुत्र शहाजीराजे भोसले यांचा विवाह १६०५ मध्ये झाला.स्वराज्याची संकल्पना राज्यात राबविणाऱ्या या दांपत्याच्या पोटी शिवबाचा जन्म झाला.छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मच जिजाऊ यांच्या ध्येय धोरणातून स्वराज्याची समतेची ममतेची न्यायाची गुढी उभी करणारा ठरला.राजमाता जिजाऊ यांच्या प्रेरणेनेच शिवबाने आपल्या मावळ्या सह स्वराज्य स्थापनेची शपथ ही रायरेश्वर मंदिरात घेतली होती. स्वराज्य स्थापनेसाठी अठरापगड जातीचा मावळा हा शिवरायांसोबत तसेच जिजाऊंच्या आज्ञेप्रमाणे खंबीर पणे लढत राहिला. स्वराज्याची संकल्पना प्रत्यक्ष कृतीत साकारण्यासाठी जिजाऊंनी शिवरायांना ज्ञान,चातुर्य संघटन कौशल्य,पराक्रम वृत्ती आदींचे प्रशिक्षण देऊ केले.जिजाऊ यांच्या स्वराज्य संकल्पनेने स्वराज्यासाठी एकनिष्ठ व प्रामाणिक राहून मराठा साम्राज्यात कार्यरत असलेले मावळे सरदार आदींसह सर्वांनाच हे आपले राज्य असल्याचे वाटायचे.स्वराज्यात त्यांनी नात्याला महत्व न देता रयतेचा कायम विचार केला.त्यामुळे प्रजा ही स्वराज्यासाठी स्वतःच्या जीवाची बाजी ही द्यायला तयार होत असत.स्वराज्यावर आलेल्या संकटाला जिजाऊंच्या मार्गदर्शनात पूर्ण ताकतीनिशी लढले जात होते.तानाजी मालुसरे, येसाजी कंक, बाजी पासलकर, मुरारबाजी, बहिर्जी नाईक यांसारखे अनेक स्वराज्याचे खरे मावळे शिलेदार स्वराज्यासाठी लढले.शहाजीराजे यांच्या वर आलेल्या संकटाच्यावेळी जिजाऊंनी बुद्धी चातुर्याने युद्ध नीतीचा वापर केला. अदिलशहा, निजाम,मुघल आदींच्या विरोधात देखील त्या शहाजीराजे यांच्या कार्यात ही खंबीरपणे उभ्या होत्या.स्वराज्यावर अनेक संकटे येत असताना संकटा विरुद्ध लढण्यासाठी त्यांनी शिवबाला अनेक मोहिमांमध्ये सहभागी करीत शत्रूला पराभूत करण्याचे मार्गदर्शन केले होते. अफजलखान,दिलेरखान, शाहिस्तेखान, सिद्धी जोहर या लढयात जिजाऊंनी शिवरायांना शत्रूला चितपट कसे करायचे.स्वराज्य कसे निर्माण करायचे हे मोलाचे प्रेरणादायी मार्गदर्शनातूनच छत्रपतींना स्वराज्याच्या शिखरावर पोहचता आले आहे.छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांसारखे रयतेच्या हितासाठी संघर्ष करणाऱ्या दोन शुरांना घडविण्यासाठी जिजाऊंनी मेहनत घेतली.शिवाजी महाराज जेव्हा आग्रा याठिकाणी अटकेत असताना स्वराज्याची सर्व सूत्रे ही जिजाऊंच्या हाती होती.यावेळी स्वराज्यावर टपून बसलेल्या मिर्जाराजा जयसिंगला ही स्वराज्यातील जमीन ही मिळविता आली नव्हती.हेच राज्यकारभार सांभाळण्याचं स्त्री कर्तृत्व या स्वराज्यात पाहायला मिळाले.स्वराज्याला अखंड स्वरूप देणाऱ्या स्वराज्य नीतीचे तंत्र शिकविणाऱ्या राजमाता जिजाऊंनी खऱ्या अर्थाने एक ऐतिहासिक अशीच कामगिरी केलेली आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सराईत गुन्हेगारांच्या टोळीतील गुन्हेगारांना केले तडीपार !

## शहरातील गुन्हेगारांचीही हद्दपारीसाठी मोठी यादी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शिरपूर व थाळनेर परिसरात गुन्हे करीत असलेले टोळीतील आकाश ऊर्फ सन्नाटा राजु थोरात, रोशन दत्तु थोरात, विशाल ऊर्फ भैच्या अरुण थोरात,राकेश रमेश थोरात हे सर्व राहणार शिरपूर येथील बौद्ध वाडा राहवासी असून गर्दी करुन दंगा करणे, दुखापती करणे, सरकारी नोकरावर हल्ला करणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, जिवेठार मारण्याचा प्रयत्न करणे, गृहप्रवेश करणे, विनयभंग करणे, दगडफेक करण, शिवीगाळ करणे, मा जिल्हादंडाधिकारी यांचे आदेशाचे उल्लंघन करणे, जिवेठार मारण्याची धमकी देवून जनतेत दहशत निर्माण करुन जिवेठार मारण्याचा प्रयत्न करणे इ. अपराध करीत होते, त्यांचे टोळीपासून सर्व सामान्य नागरीकांचे जिवितास, मालमत्तेस भय व धोका निर्माण झालेला होता. त्यांचेमुळे परिसरातील सुव्यवस्था बाधीत होत असल्याने, त्यांना तात्काळ प्रतिबंध घालणे करिता सदर टोळीची पांगापांग करुन टोळीस हद्दपार करणे अगत्याचे झाले होते.

सदर टोळी गंभीर स्वरुपाचे शरीर व मालमत्ते विरुध्दचे अपराध समाजात अशांतता माजवून सर्वसामान्य नागरीकांना त्रास होईल तसेच आर्थिक नुकसान होईल असे गैरवर्तन करीत होते. सदर टोळीविरुध्द प्रतिबंधक कारवाई देखील त्यांचे वर्तनात सुधारणा झालेली नव्हती. सदर टोळीकडून धुळे जिल्हयात हिंसक घटना घडून भिती व दहशतीचे वातावरण निर्माण होवु नये, तसेच सर्व सामान्य नागरीकांना उपद्रव होवु नये, याकरिता वर नमुद गुन्हेगारांचे टोळीस महाराष्ट्र पोलीस अधिनियम सन 1951 चे कलम 55 मधील तरतुदी नुसार दोन वर्षाकरिता धुळे व नंदुरबार जिल्हयातुन



हद्दपार (तडीपार) करण्यात आले आहे. सदर टोळीने आमची अथवा महाराष्ट्र शासनाची लेखी पूर्व परवानगी शिवाय प्रतिबंधित क्षेत्राच्या हद्दीत प्रवेश केल्यास अगर मिळुन आल्यास म.पो.का.क. 142 नुसार दोन वर्ष शिक्षा अगर दंडाचे अपराधास पात्र राहतील.

सदर कारवाई श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक धुळे, श्री. किशोर काळे, अपर पोलीस अधीक्षक धुळे यांचे मार्गदर्शनाखाली उ.वि.पो.अ.सचिन हिरे, शिरपूर उपविभाग शिरपूर / पोनिरी दत्तात्रय शिंदे, स्थानिक गुन्हे शाखा धुळे / शिरपूर शहर पोलीस स्टेशनचे पोनिरी.ए.एस. आगरकर व पोउनि संदीप मुरकुटे, शिरपूर शहर पोलीस स्टेशन / स्थानिक गुन्हे शाखेचे पोहेकॉ संतोष हिरे / पोको हर्षल चौधरी तसेच शिरपूर शहर पोलीस स्टेशनचे पोहेकॉ. जब्बार शेख व होमगार्ड नाना अहिरे यांनी केली आहे.



# कळवण तालुक्यातील ४२ गावांतून मराठा बांधव मुंबईत धडकणार

आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** आरक्षण आंदोलनामध्ये सहभागी होण्यासाठी कळवण तालुक्यातील ४२ गावांमधून ट्रॅक्टर, जीप, पीकअप वाहनातून जास्तीत जास्त संख्येने मराठा समाज बांधव मुंबईकडे निघणार असून मराठा क्रांती मोर्चानंतर पुन्हा एकदा कसमादेची ताकद मुंबईमध्ये दाखवून देण्याचा निर्धार कळविण्याच्या छत्रपती शिवाजी महाराज मंगल कार्यालयात झालेल्या बैठकीत मराठा बांधवांनी केला. उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस व अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या वक्तव्याचा व भूमिकेचा या बैठकीत वक्त्यांनी खरपूस समाचार घेत निषेध नोंदविला. बैठकीला मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक करण गायकर, नाना बच्छाव, सुरेश पवार, योगेश सोनवणे, संदीप सोनवणे, जितेंद्र पगार, प्रदीप पगार, प्रमोद रौंदळ, रामा पाटील आदी व्यासपीठावर उपस्थित होते. मनोज जरांगे पाटील यांनी उभा केलेला हा लढा गरीब मराठ्यांसाठी असल्याने सर्व मराठ्यांनी आंदोलनाला ताकद द्यावी, सहकुटुंब शिदोरी सोबत घेऊन या आंदोलनात सक्रिय सहभागी व्हावे. तालुक्यातील मराठा समाज बांधवांच्या घरोघरी जाऊन जनजागृती करत मुंबई येथे सर्वांनी येण्याचे निमंत्रण द्यावे असे आवाहन करण गायकर यांनी केले.प्रास्ताविक प्रमोद रौदळ यांनी केले तर आभार प्रदीप पगार यांनी मानले. बैठकीला संभाजी पवार, हेमंत पाटील, माणिक देवरे विलास रौदळ, संतोष देशमुख, अजय पगार, सुरेश पगार, संदीप वाघ, विक्रांत पगार, संदीप शिंदे, किशोर पवार, नामदेव पगार, देवा शिंदे, दिनेश शेवाळे, दीपक देवरे,नीलेश बोरसे, सागर पगार, ललित आहेर, सनी देवरे' आदी उपस्थित होते.

# विद्यार्थिनींनी स्त्री शिक्षण, सावित्रीबाईंचा जीवनसंघर्ष समजून घ्यावा : रंजना मापारी

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** नगरपरिषद शाळेतील एकूण ६ शाळामधील विद्यार्थिनींना नगर सेविका तथा बांधकाम सभापती रंजना राजेश मापारी यांनी संकल्पनेतून स्वखर्चाने सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित व शिक्षण संघर्ष संबंधित 'सत्यशोधक' चित्रपट लोणार येथील श्री चित्रपटगृह मध्ये दि. १० जानेवारी २०२३ रोजी सकाळी १०:०० ते १२:०० या वेळेत दाखविण्यात आले. प्रतिकूल काळात व प्रचंड सामाजिक विरोध पत्करून स्त्री शिक्षण व सक्षमीकरणासाठी संपूर्ण आयुष्यभर संघर्ष करणारे महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचा जीवन संघर्ष 'सत्यशोधक' चित्रपटातून साकारला आहे. याचे आदर्श समोर ठेवून विद्यार्थिनींनी सुद्धा आपले जीवनामध्ये शिक्षणाचे महत्त्व समजून घ्यावे तसेच शिक्षणामध्ये येणाऱ्या अडचणीवर मात करून समाज व नवीन पिढी घडवावे आहे. या हेतुने हा चित्रपट विद्यार्थिनींना मोफत दाखविण्यात आला आहे. हा चित्रपट ५ जानेवारीला प्रदर्शित झाला आहे. यातून सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रासह त्यांचे मानवी जीवनासाठी लाभलेले योगदान मांडण्याचा प्रयत्न केला आहे, जो केवळ महात्मा फुले यांचं कार्य दाखवत नाही तर ज्योती सावित्री विचाराने किती उत्तुंग होते, याचं प्रत्यय देतो. यावेळी रंजना राजेश मापारी सहपरिवार उपस्थित होत्या तसेच मुख्याधिकारी विभा वराडे, प्रशासन अधिकारी सतीश कापुरे, सर्व शाळेतील मुख्याध्यापक तसेच शिक्षिका व शिक्षक उपस्थित होते.



# अमानचे वनविभागाच्या परीक्षेत घवघवीत यश..!

## किराणा दुकानात काम करून करायचा अभ्यास

आधुनिक केसरी न्यूज



**पिशोर :** कन्नड शहरात सायकलवर फिरवून किराणा दुकानदारांना माल पुरवणाऱ्या पुरविणाऱ्या विक्रेत्याचा मुलगा वनविभागाने घेतलेल्या वनरक्षक पदाच्या परीक्षेत पास होऊन तो मेरिट लिस्ट मध्ये पोहोचला आहे यासंबंधीचे वृत्त असे की कन्नड शहरातील अल्पसंख्यांक समाजाचे श्री मुजफ्फर खान हे शहरभर फिरून सायकलवर फिरवून किराणा माल दुकान किराणा दुकानांना विविध प्रकारचा माल पुरविण्याचा व्यवसाय करतात त्यांचा मोठा मुलगा खान अमान मुजाफर हा सध्या बी एस सी च्या तिसऱ्या वर्गात कन्नड महाविद्यालयात शिकत आहे परंतु परिस्थितीमुळे किराणा दुकानात काम करणाऱ्या या अमान ने आक्क्टोंबर 2023 मध्ये वनरक्षक गट क च्या पदासाठी लेखी परीक्षा दिली व नुकताच वनविभागाच्या परीक्षेचा निकाल लागला या परीक्षेत त्यांनी मेरिट लिस्ट मध्ये संभाजीनगर जिल्ह्याच्या मेरिट लिस्ट यादीत स्थान मिळवले. अमान हा सध्या पिशोर नाका येथील भरत सोनवणे यांच्या तिरुपती प्रोविजन या दुकानात कामाला आहे. घरात वडील एकटेच कमावणारे व मी मोठा मुलगा असल्याने कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी मदत करावी लागत आहे. काम करीत असताना वेळ मिळेल तसा या परीक्षेचा अभ्यास करून यश मिळविल्याचे अमान सांगतो. आमचे त्याच्या या यशाबद्दल भरत सोनवणे मधु महाले सुभाष पाटील लोढरेकर प्राध्यापक रमेश सूर्यवंशी शेख शाहिद नुमान पटेल नगरसेवक असद पवार आदींनी अभिनंदन केले आहे.

# अंगणवाडी कर्मचाऱ्यांनी केली बेकायदेशीर नोटीसची होळी

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या विवीध थकित मागण्याची पूर्तता न केल्यामुळे दि.११ जानेवारी रोजी जिल्ह्यातील मानोरा पंचायत समितीवर तालुक्यातील शेकडो अंगणवाडी सेविका, मदतनीस यांनी देण्यात आलेल्या बेकायदेशीर नोटीस ची होळी केली.दरम्यान ठिय्या आंदोलन करून नारेबाजी केल्याने पंचायत समिती परिसर दुमदुमून गेला होता.

मानोरा तालुक्यांतील अंगणवाडी कर्मचारी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघातर्फ सर्व प्रथम शहारातील बसस्थानक परिसरात सर्व अंगणवाडी सेविका,मदतनीस एकत्र जमून शिस्तबद्ध पद्धतीने तहसील परिसरात गेल्या. तेथुन मार्गक्रम करीत घोषणाबाजी देत पंचायत समितीवर धडकल्या. येथे ठिय्या आंदोलन करून प्रलंबित मागण्याची घोषणाबाजी केली.अंगणवाडी कर्मचारी यांना मॅच्युईटी, दरमहा पेन्शन, वेतनश्रेणी चा लाभ देण्यात यावा.या प्रमुख मागणीसाठी पंचायत समिती परिसरात अंगणवाडी सेविका,मदतीस यांनी ठिय्या आंदोलन केले. शासन प्रशासनाने मागण्याची दखल घ्यावी याकरिता ४ डिसेंबर पासुन बेमुदत संपावर आहेत. संपावर जाण्यापुर्वी संघटनेने रितसर नोटीस शासन व प्रशासन कार्यालयात दिली आहे. शासन व प्रशासन अंगणवाडी कर्मचाऱ्याचे प्रश्न सोडविण्या ऐवजी आम्हाला बेकायदेशीर नोटीस देण्याचा सपाटा लावला आहे. जे नैसर्गिक न्यायतत्वाच्या विरोधात आहे त्यामुळे प्रकल्पातील सर्व अंगणवाडी कर्मचाऱ्याच्या मनात असंतोष निर्माण झाला आहे.

**जि . प . शिक्षक समन्वय कृती समितीचा अगनवाडी सेविकाना पाठिंबा :** अगणवाडी सेविका यांनी ज्या शासन दरबारी मागण्या मांडल्या आहेत त्या मागण्या रास्त असून शासनाने ह्या मागण्या मान्य कराव्यात त्याकरिता आम्ही शिक्षक समन्वय कृति समितीच्या वतीने त्याना जाहीर पाठींबा देत आहोत त्याच्या मागण्या शासनाने मान्य कराव्यात त्या करिता आम्ही पाठींबा देत आहो असे कृती समितीचे अध्यक्ष प्रवीण महातारमरे यांनी निवेदन देण्यात आले यावेळी अनेक शिक्षक उपस्थित होते .

परिणामी,अंगणवाडी कर्मचारी ११ जानेवारी रोजी एकत्र येऊन बेकायदेशीर दिलेल्या नोटीसची होळी करण्यात आली आहे.

या आंदोलनाचे रूपांतर सभेमध्ये झाले. यावेळी माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तथा विद्यमान जिल्हा परिषद सदस्य अरविंद पाटील इंगोले, अनिल डेरे, तालुका अध्यक्ष प्रमिला पखाले यांनी सभेला मार्गदर्शन केले.अंगणवाडी कर्मचाऱ्याने थकित टी.ए.डी.ए, नवीन मोबाईल, नवीन मदतनीसाचे थकित मानधन, इधन बिलाची रक्कम व सेवानिवृत्त महिलाना एकरकमी अंगणवाडी कर्मचारी महिला हया महिला लाभ मिळेपर्यंत, अंगणवाडी कर्मचारी आपल्या बेमुदत ठिय्या धरणे आंदोलन करणार आहेत.असा इशारा सुद्धा देण्यात आला.

यावेळी तालुकाध्यक्ष प्रमिला पखाले,रेखा चाहंदे,भाग्यश्री डेरे, कौसल्या बेलखेडे, चंद्रकला तायडे,वर्षा भुते,सुलभा पत्की,देवका लुलेकर, मीना डेरे, द्वारका काळे आदीसह अंगणवाडी कर्मचारी महिलांचा समावेश होता. यावेळी पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



# जगातील दोन महापराक्रमी आणि आदर्श छत्रपती घडवणारी आदर्श माता राजमाता जिजाऊ आऊसाहेब !

आधुनिक केसरी

**शिस्त, स्वाभिमान आणि संस्कार हेच जिजाऊंचे विचार आजही आपल्या समाजाला प्रेरक आहेत.राजमाता जिजाऊ आऊसाहेब यांच्या संस्कारातूनच जगातील दोन महापराक्रमी आणि आदर्श छत्रपती घडविले ते म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज होत.स्वराज्य निर्मितीतून रयतेचे राज्य निर्माण झाले.हे स्वराज्य निर्माण करण्यासाठी राजमाता जिजाऊ खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराज यांना खऱ्या मार्गदर्शक म्हणून गुरूस्थानी ठरल्या.त्यांच्या मार्गदर्शनाने हे स्वराज्याचे शिखर गाठता आले. स्वराज्य संकल्पनेच्या बीजाचा वटवृक्ष करण्यासाठी अखंड प्रेरणा ठरलेल्या राजमाता जिजाऊ यांच्या रूपाने स्त्री-शक्ती आणि धैर्याचे अतुल्य उदाहरण आपल्याला लाभले आहे.**



छत्रपती शिवाजी महाराजांना ज्ञान, चातुर्य, संघटन, पराक्रम आणि सत्त्वगुणांचे बाळकडू देणाऱ्या राजमाता जिजाऊ यांच्या कर्तृत्वाला शौर्य, नीती आणि धैर्य अशा गुणांचा वारसा त्यांनी आपल्या महाराष्ट्राला दिला.माता केवळ मायाळू नसून शक्ती असू शकते याचं सर्वात मोठं उदाहरण जिजाऊ चे असू शकतात. राजमाता जिजाऊ यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून स्वराज्य निर्माण करणारे छत्रपती शिवाजी महाराज घडवले. स्वराज्य संकल्पनेची बी मातेनेच आपल्या शिवरायांच्या मनात पेरली.तुम्हाला स्वराज्य निर्माण करायचे आहे असा प्रचंड आत्मविश्वास शिवरायांमध्ये निर्माण केला तसेच बालपणापासून त्यांना तयार केले.तिच्या मायेच्या छायेत नव्हता जाती धर्म सर्वधर्म समभाव हे एकच तिचे कर्म होते.स्वराज्यासाठी एक नाही तर दोन दोन छत्रपती घडवणाऱ्या राष्ट्रमाता,राजमाता जिजाऊ ह्या थोर बनल्या.स्त्रियांचा सन्मान छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्यात दाखवून दिला. अनेक आदर्शवादी उदाहरणे आपल्या स्वराज्यात डोकावून पाहिले तर आढळुन येते.स्वराज्यात एखाद्या स्त्रीवर अन्याय झाला तर तिला न्याय मिळवून देण्याची भूमिका छत्रपती शिवाजी महाराज अगदी तळमळतेने पार पाडत होते.

जिजाऊंच्या शिकवणीतून तयार झालेले छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी स्त्रियांच्या सन्मानाला नेहमी आदराचे स्थान दिले.आज ह्या आदर्शवादी छत्रपतींच्या आदर्शांचे अनुकरण होणे अपेक्षित आहे. ज्या जिजाऊंनी हे दोन्ही छत्रपती घडविले. त्या जिजाऊ यांचा आदर्श समाजात पेरण्याची वेळ आलेली आहे. स्वराज्यात ज्या पद्धतीने महिला सुरक्षित राहिली जात होती.अगदी त्याच विचाराची पेरणी समाज मनात करण्याची गरज आहे. आज राज्यात, देशात महिलावर वाढत असलेले अन्याय अत्याचार हे गंभीर स्वरूपाचे आहेत. रोज कुठे ना कुठे महिला ही अत्याचाराची बळी पडत आहे. यावर अटकाव आणण्यासाठी महिला सक्षमीकरण करत असताना आता महिलांना राजमाता जिजाऊ यांचा कणखर बाणा शिकविणे गरजेचे आहे. शिवाय महिलांनी आता येणाऱ्या प्रत्येक परिस्थितीवर मात करण्यासाठी संघर्ष करत राहिले पाहिजे.ज्या महाराष्ट्रात राजमाता जिजाऊ यांचा जन्म झाला आणि त्यांच्या जन्माने खऱ्या अर्थाने स्वराज्याचा अर्थ हा समजत असताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यातून प्रजेला हे आपले स्वराज्य असल्याचे जी भावना निर्माण झाली होती.तीच भावना आजही आपल्या समाजाला मार्गदर्शक आणि पुढे घेऊन जाणारी ठरणारी आहे.त्यामुळे राजमाता जिजाऊ यांचे कार्य आणि विचार महिलांनी अंगीकरण्यासाठी त्यांना अभ्यासणे नितांत गरजेचे आहे. स्वतःवर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी खंबीरपणे लढले पाहिजे.इथे अनेक वाईट नजरा आपल्या अवती भवती असताना त्या नजरेस भिडण्याची ताकत निर्माण करण्याची गरज आहे.जिजाऊं ने शिवबा घडविला.स्त्री सन्मानाची शिकवण शिवरायांकडुन घ्यायला हवी.पुरुष सत्ताक अहंकाराने सुद्धा महिलांना मान सन्मान देणे आवश्यक आहे.महिलांनी जिजाऊंचा आदर्श घेऊनच आपल्या जीवनाला निर्भीड करायला हवे. अन्यायाचा प्रतिकार हा केलाच पाहिजे.जिजाऊंचे व्यक्तिमत्वच महिलांसाठी स्वतःचे संरक्षण करण्यास मदत करणारे आहे.संरक्षक भिंतीप्रमाणेच त्यांचे कार्य महिलांना स्वतःच्या अन्याया विरोधात लढण्याचे बळ मिळवून देईल.जिजाऊंच्या विचाराने प्रेरित झालेली महिला नक्कीच अन्यायाला वाचा फोडेल असा विश्वास वाटतो.



शिवश्री शौकत शेख
उपाध्यक्ष-संभाजी ब्रिगेड
(खंडाळा तालुका)
९७६४००९३१०

**आई अशी असावी माता।
जिचा वाटावा अभिमान
।। पुत्र घडवला ऐसा।
जो राष्ट्राची शान ।।
देश प्रितीचे धडे गिरवले
तिजपाशी बसुनी। धन्य
जिजाऊ, धन्य जिजाऊ
नमन तिला लवुनी ।।
राष्ट्रमाता राजमाता
जिजाऊ जन्मोत्सवाच्या
शिव शुभेच्छा.**

# साठवण बंधाऱ्यांसाठी 14 कोटी 29 लक्ष रुपयांचा निधी मंजूर

## शेकडो हेक्टर शेतीच्या सिंचनाचा प्रश्न सुटणार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आ. किशोर जोरगेवार यांच्या



मागणीला मोठे यश आले असून चंद्रपूर मतदार संघातील गेटेड बंधा-यांसाठी 14 कोटी 29 लक्ष रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून ग्रामीण भागात 10 ठिकाणी गेटेड बंधारे तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील शेकडो ऐक्टर शेतीच्या सिंचनाचा प्रश्न सुटणार आहे.

चंद्रपूर मतदार संघातील ग्रामीण भागात विकासाला गती प्राप्त झाली आहे. येथील विकासकामांसाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी विविध विभागांतर्गत मोठा निधी उपलब्ध करुन दिला आहे. या निधीतून येथे अनेक सोयी सूविधा उपलब्ध केल्या जात आहे. 13 जानेवारीला शनिवारी ग्रामीण भागातील 11 कोटी 13 लक्ष रुपयांच्या 51 विकासकामांचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते भुमिपूजन केल्या जाणार आहे.

दरम्यान ग्रामीण भागात गेटेड बंधारे बांधण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली होती. त्यानंतर सदर मागणी पूर्ण करण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांचे प्रयत्न सुरु होते. यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मृद व जलसंधारन मंत्री संजय राठोड यांना निवेदन दिले होते. त्यानंतर आमदार किशोर जोरगेवार यांनी सदर मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता. अखेर त्यांच्या या पाठवूराव्याची दखल घेण्यात आली असून सदर मागणी मान्य करण्यात आली आहे. यासाठी महाराष्ट्र जलसंधारन महामंडळच्या वतीने 14 कोटी 29 लक्ष 1 हजार 245 रुपयांचा निधी मंजुर केला आहे. या निधीतून मतदार संघातील 10 ठिकाणी गेटेड बंधारे तयार करण्यात येणारे आहे. यात आरवट -हिंगनाळा - शिवणी चोर येथील बंधा-यासाठी 1 कोटी 85 लक्ष रुपये, वढा - उसगाव येथील दोन बंधा-यासाठी 2 कोटी 65 लक्ष, सोनेगाव - अंतुर्ला येथील दोन बंधा-यासाठी 3 कोटी 25 लक्ष रुपये, वेंढली 1 आणि वेंढली 2 येथील बंधा-यासाठी 3 कोटी 70 लक्ष, पांढरकवडा येथील बंधा-यासाठी 86 लक्ष, दाताळा - चिंचाळा येथील बंधा-यासाठी 88 लक्ष रुपये खर्च करुन गेटेड बंधारे बांधण्यात येणार आहे.

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प आपण केला आहे. यासाठी विविध विभागाअंतर्गत निधी आपण उपलब्ध करुन देत आहोत. येथील शेतीला मुबलक पाणी मिळावे यासाठी आपण आराखडा तयार केला होता. यात गेटेड बंधारे बांधण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. तेव्हा पासून सदर बंधा-यांसाठी निधी मंजूर करण्याची मागणी आपण केली होती. याचा पाठपूरावाही आपण सातत्याने सूरु ठेवला होता. याची दखल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मृद व जलसंधारन मंत्री संजय राठोड यांनी घेतली आहे. एक मोठी मागणी मार्गी लावता आली याचे समाधान आहे. तयार होणार असलेल्या या गेटेड बंधा-यांमुळे शेकडो ऐक्टर शेतीच्या सिंचनाचा प्रश्न सुटणार असल्याचे आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे. सोबतच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मृद व जलसंधारन मंत्री संजय राठोड यांचे आभार मानले आहे.




# महिला आरोग्य, जनजागृती राष्ट्रीय कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**घुघुस :** स्थानिक चिंतामणी शिक्षण प्रसारक मंडळ बल्लारपूरद्वारा संचालित चिंतामणी महाविद्यालय, घुघुस, येथील I.Q.A.C. आणि समाजशास्त्र विभागाच्या वतीने , अर्थ फाउंडेशन, गडचांदूर व टाटा कॅन्सर केअर प्रोग्राम (मुंबई), चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबराचे आयोजन चिंतामणी महाविद्यालय घुघुस येथे दिनांक 10 जानेवारी 2024 रोज बुधवारला सकाळी 10 वाजता करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटक सौ. नीतू विनोद चौधरी ( माजी सभापती, महिला व बालकल्याण जिल्हा परिषद, चंद्रपूर ) हे होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. रवि धारपवार हे होते. कार्यक्रमाचे विशेष अतिथी डॉ.भूषण मोरे (संचालक, अर्थ फाउंडेशन, गडचांदूर) हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे डॉ. आशिष बारब्दे (प्रोग्राम मॅनेजर, टाटा ट्रस्ट, चंद्रपूर ) हे होते. प्रमुख पाहुणे डॉ. एन. पडगिलवार (तालुका आरोग्य अधिकारी, चंद्रपूर ), डॉ. ट्विंकल ढेगळे (दंत रोग तज्ञ, चंद्रपूर) यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पाडण्यात आले. तसेच मंचावर उपस्थित डॉ. सुरज साळुंखे (जिल्हा समन्वयक, टाटा ट्रस्ट, चंद्रपूर) सौ. वैष्णवी सहारे (टाटा ट्रस्ट, चंद्रपूर ) सौ.अपर्णा चालूरकर (टाटा ट्रस्ट, चंद्रपूर ) सौ. आंबेकर मॅडम ( जिल्हा समुपदेशक, मैत्री क्लिनिक, चंद्रपूर) सौ. ॲड. बोरीकर मॅडम (समुपदेशक,चंद्रपूर ), सौ किरण बोढे (अध्यक्ष, प्रयास सखी मंच, घुगुस ) सौ संध्या पाटील (सरपंच, ग्रामपंचायत, म्हातारंदेवी) मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटक सौ. नीतू चौधरी यांनी चिंतामणी महाविद्यालयांतील मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे रीतसर उद्घाटन झाले असून आयोजकानी या ठिकाणी ग्रामीण भागातील परिसरातील नागरिकांसाठी सुंदर अशी संधी उपलब्ध करून देऊन नागरिकांनी त्या संधीचा फायदा घ्यावा असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. रवी धारपवार यांनी शिबिरामध्ये आलेल्या सर्व मान्यवरांचे आणि आरोग्य तपासणीसाठी आलेल्या सर्व नागरिकांचे मनस्वी आभार मानुन सर्वांनी या संधीचा अवश्य लाभ घेऊन डॉक्टरांच्या मार्गदर्शनानुसार त्यांनी आपल्या जीवनात अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे विशेष अतिथी डॉ. भूषण मोरे यांनी नागरिकांना होत असलेल्या विविध आजारविषयी नागरिकांनी या शिबिरात विविध तपासण्या करून घेऊन त्याचा पुरेपूर लाभ घेण्याचे आवाहन केले. आजच्या आधुनिक युगात बदलत्या जीवनशैलीमध्ये तसेच चुकीच्या खानपानमुळे आणि अवेळी झोपण्याच्या सवयीमुळे देखील व्यक्तीच्या आरोग्यावर अतिशय विपरीत परिणाम झाल्याचे आढळून येते. त्यामुळे व्यक्तीला विविध रोगाने ग्रासलेले असून त्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागते.

# सोयगाव तालुक्यात ढगाळ वातावरणामुळे रब्बी पीक धोक्यात

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात गेल्या आठवड्यापासून सततचे ढगाळ वातावरण आणि थंडी कमी असल्याने रब्बी हंगामातील गहू, हरभरा, कांदा, मका, भुईमुग यासह भाजीपाला पिकांवर रोगांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे कीडनाशकांची फवारणी करीत पिके वाचिवण्याचा प्रयत्न सावळदबारा येथील शेतकरी करीत आहेत. दुष्काळी परिस्थितीमुळे अगोदरच शेतकरी अडचणीत आलेले आहे. तर सप्टेबर ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीनेही खरीप पिके पूर्णपणे वाया गेली. त्यामुळे नव्या उमेदीने क्वचीत शेतकरी रब्बी पिके घेण्याचा प्रयत्न करीत आहे. मात्र सततच्या ढगाळ वातावरणामुळे या पिकांवर रोगाचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे पिके वाया जाण्याची धास्तीने सावळदबारा परिसरातील शेतकरी वर्ग चिंतेत पडला आहे. रब्बी हंगामासाठी विहिरीत पाणी हि कमी आहे , पण रब्बीतील गहू आणि हरभऱ्याच्या वाढीसाठी पूरक वातावरणाची निर्मिती होणे आवश्यक आहे. त्यामुळे याचा विपरित परिणाम उत्पादनावर होण्याची शक्यता आहे. स्वच्छ वातावरण आणि गारठा असेल तरच गव्हाची आणि हरभऱ्याची वाढ जोमदार होऊ शकेल. पावसाळी वातावरण आणि ढग कायम राहिले तर खरिपाप्रमाणेच रब्बीचे नुकसान होईल, अशी भीती शेतकरी व्यक्त करू लागले आहेत.यावर्षी कांद्याला विक्रमी बाजारभाव मिळाल्याने बहुतांश शेतकरी कांद्याकडे वळले आहेत. त्याचबरोबर गहू, ज्वारी, हरभरा या पिकांना देखील शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले. मात्र गेल्या आठवड्याभरात सतत ढगाळ वातावरण निर्माण होत असल्याने रब्बी पिकांना रोगराईने ग्रासले आहे.



**कृषी विभागाने मार्गदर्शन करण्याची मागणी :** गव्हाची पेरणी होऊन एक महिना होत आला . मात्र पुरेशा थंडीअभावी गव्हाची वाढ देखील खुंटली आहे . दोन दिवसांपूर्वी काही ठिकाणी पावसाच्या हलक्याशा सरी कोसळल्या आहेत . त्यामुळे या वातावरणामुळे गव्हावर तांबेरा तर हरभऱ्यावर अळीचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती शेतकरी व्यक्त करू लागला आहे . असेच वातावरण काही दिवस टिकून राहिले तर खरिपाप्रमाणेच रब्बी हंगामातील पिके देखील वाया जाण्याची शक्यता आहे
**दिनेश रत्नाकरआप्पा चोपडे सावळदबारा तालुका उपाध्यक्ष सोयगाव .**

# मलनि:सारण प्रकल्पास 542 कोटींची प्रशासकीय मान्यता

## मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे फलित

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** केंद्रशासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियानांतर्गत चंद्रपूर महानगरपालिकेच्या रु. 542.05 कोटीच्या मलनिःस्सारण प्रकल्पासाठी प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.



राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे फलित आहे. यासंदर्भातील शासन निर्णय नगर विकास विभागाने निर्गमित केला आहे.

केंद्र शासन पुरस्कृत 2.0 अभियानाची शासन निर्णयान्वये सन 2021-22 पासून राज्यामध्ये अंमलबजावणी करण्यात येत आहे. सदर अभियानांतर्गत पाणीपुरवठा सरोवरांचे पुनर्जीवन व हरित क्षेत्र विकास आदी पायाभूत सुविधांची निर्मिती राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये करण्यात येणार आहे. आणि यापूर्वीच्या अमृत अभियानांतर्गत समाविष्ट असलेल्या राज्यातील 44 शहरांमध्ये मलनिःस्सारण सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत राज्याच्या 18236.39 कोटी प्रकल्प किमतीच्या राज्य जलकृती आराखड्यास केंद्र शासनाने मान्यता दिलेली आहे. चंद्रपूर महानगरपालिकेच्या मलनिःस्सारण प्रकल्पांतर्गत कार्य सर्वेक्षण, मलनिःस्सारण प्रणाली, गृह सेवा कनेक्शन, रस्ता पुनर्रसंचयित करणे, रेल्वे क्रॉसिंग पुढे ढकलणे, राष्ट्रीय महामार्ग 9 आणि नाला क्रॉसिंग एकूण 7, पंपिंग मशिनरी, सीवरेज पंपिंग स्टेशन, सीवर स्वच्छता तपासणी आणि नूतनीकरण आदी कामे असणार आहे. सदर प्रकल्पाची अंमलबजावणी विहितकालावधीत पूर्ण करण्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा, प्रकल्पव्यवस्थापन सल्लागार व प्रकल्प व्यवस्थापन विकास व व्यवस्थापन सल्लागार यांची संयुक्तरीत्या राहील. अमृत 2.0 अभियानांतर्गत मार्गदर्शक सूचनेनुसार सदर प्रकल्पासाठी प्रकल्प व्यवस्थापक सल्लागाराची नेमणूक करावी. केंद्र शासन पुरस्कृत अमृत 2.0 अभियानाच्या केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या सर्व मार्गदर्शक सूचना चंद्रपूर महानगरपालिकेच्या मलनिःस्सारण प्रकल्पास लागू राहतील. पहिल्या टप्प्यात चंद्रपूर शहरात 233 किलोमिटर पाईप लाईन मलनिःसारण करण्यासाठी होणार असून यातून शहरातील 54 हजार घरांना जोडणी होणार आहे..



# भाजयुमोर्चातर्फे नमो चषकाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**कळवण :** भारतीय जनता युवा मोर्चा कळवण तालुका यांच्यातर्फे नमो चषक नियोजन करण्यात येणार असून त्या संदर्भात आज देवू करिअर अकॅडमी बेज येथे बैठक पार पडली. नमो चषक कार्यक्रमप्रसंगी विविध अशा स्पर्धा कळवण सुरगाणा विधानसभा क्षेत्रात घेण्यात येणार आहेत. त्यासाठी ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करण्यासाठी HTTPS://NAMOCHASHAK.IN ही लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.जास्तीत जास्त खेळाडू बांधवानी स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात आले. यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष श्री दिपकजी खैरनार व जिल्हा उपाध्यक्ष चेतन निकम, यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. जिल्हा सरचिटणीस यतिन पवार, सोशल मीडिया सेल प्रमुख हेमंत पगार, तालुकाध्यक्ष आशुतोष आहेर, शहराध्यक्ष अमोल पगार, ता अध्यक्ष किशोर तोटे (कळवण पश्चिम), कोषाध्यक्ष रोशन सिंग परदेशी, सरचिटणीस संदीप आहेर, गणेश सोनवणे, योगेश खांडवी, चिटणीस हिरामण शिंदे धनंजय रौंदळ, मनोज मेधने, तुषार पगार, तसेच नागेश मोरे, नितीन पवार, देविदास जाधव, काळू वाघ, भीमराज चौरे, भास्कर गायकवाड आदी युवा मोर्चा पदाधिकारी उपस्थित होते.

# नायलॉन मांजाचा वापर करू नये: उपनिरीक्षक खाडे यांचे आव्हान

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** मकरसंक्रांतिच्या सणानिमित्त पतंग उडवताना , मांजा चा वापर न करण्याचे पोलीस उप निरीक्षक खाडे यांचे आव्हान. वडोद बाजार प्रतिनिधी. वडोद बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावातील नागरिकांनी दुकानदारांनी नायलॉन मांजा सारख्या दोऱ्याची विक्री करू नये तर मकरसंक्रांतिच्या सणानिमित्त पतंग उडवताना , मांजा चा वापर न करण्याचे आव्हान. वडोद बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संभाजी खाडे यांनी केले पोलीस ठाणे वडोद बाजार हद्दीतील वडोद बाजार येथील पोलीस उपनिरीक्षक संभाजी खाडे यांनी मकर संक्रातीच्या सणाच्या अनुषंगाने पतंग उडवण्यासाठी वापरण्यात येणारा नायलॉन मांजा विक्रीवर बंदी आहे त्या अनुषंगाने जनरल स्टोअर्स दुकानाची पाहणी करण्यात आली व तसेच दोन पंचा समक्ष नील पंचनामा करण्यात आलेला आहे तसेच पोलीस ठाणे वडोद बाजार पोलीस ठाणे यांच्यावतीने मकर संक्रातीच्या सणानिमित्त पतंग उडवताना जनतेने तसेच विक्रेत्यांनी नायलॉन मांजा ची विक्री तसेच वापर करू नये असे पोलीस ठाणे वडोद बाजार यांच्या वतीने आवाहन करण्यात आले. फोटो. वडोद बाजार येथील एका जनरल स्टोअर्स या दुकानात नायलॉन मांजा सारख्या दोरा तपासणी करताना पोलीस उपनिरीक्षक संभाजी खाडे.

# ईव्हीएमविरोधात भारत मुक्ती मोर्चाचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** ईव्हीएम यंत्र हटवा, मतदान चिठ्ठ्यांचा वापर करा आणि लोकशाही वाचवा, या मागण्यांसाठी बुधवारी भारत मुक्ती मोर्चाच्या जिल्हा शाखेतर्फे तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्यात आले. ईव्हीएम यंत्रातील मतदानासोबतच व्हीव्हीपीएटीतील निघालेल्या चिठ्ठ्यांची शंभर टक्के मोजणी करावी यासह २० मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले. भारत मुक्ती मोर्चाचे खान्देश प्रभारी नितीन गाढे व जिल्हाध्यक्ष देवानंद निकम यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आल्याचे खान्देश प्रभारी गाढे यांनी सांगितले. लोकांचा आक्षेप ईव्हीएम यंत्रावर आहे. आजही ईव्हीएममधील मतांच्या आधारेच निकाल जाहीर होतो. ईव्हीएममधील मतांचा घोटाळा होऊ नये म्हणून व्हीव्हीपीएटी यंत्रे लावण्यात आली.

# आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या खासगी सावकारांवर तत्काळ गुन्हे दाखल करा : पवन धायगुडे

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** खाजगी सावकारीचे जाळे मोठ्या प्रमाणात वाढलेले असून यातून अनेकांची होरपळ होत आहे. पैसे वसूल न झाल्याने पैसे देण्यासाठी तगादा लावला जात आहे. जास्तीचे पैसे घेण्याचा प्रयत्न सुद्धा हा खाजगी सावकाराकडून होत आहे. आत्महत्या करण्याची वेळ अनेकांवर येत आहे. खाजगी सावकारीच्या विरोधात वाचा फोडण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) हा आक्रमक झालेला असून या पक्षाचे खंडाळा तालुकाध्यक्ष पवन धायगुडे यांनी सातारा जिल्ह्याचे अप्पर पोलीस अधिक्षक आंचल दलाल यांना निवेदन दिले. आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या खाजगी सावकारांवर तात्काळ गुन्हे दाखल करा. अन्यथा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय दिपक भाऊ निकाळजे साहेब यांच्या आदेशानुसार महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष दादासाहेब ओव्हाळ यांच्या नेतृत्वाखाली तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल, असा इशारा पवन धायगुडे यांनी दिलेला आहे. पवन धायगुडे यांचे असे म्हणणे आहे की, महाराष्ट्रासह सातारा जिल्हा खंडाळा तालुक्यांमध्ये मागील तीन चार वर्षापूर्वी कोरोना माहामारिने हाहाकार माजवला



होता. त्यावेळेस व्यापारी छोटे-मोठे लघुउद्योजक व्यावसायिक व्यापारी यांना याचा मोठा फटका बसला होता. अशातच खंडाळा तालुक्यातील मोठी बाजारपेठ असलेल्या शहरातील एका व्यक्तीने टेलरिंग व लेडीज शॉपी व्यवसाय करण्यासाठी त्यावेळी व्यवसायासाठी पैशाची गरज असल्याने त्यांच्या ओळखीचे संतोष बलभीम पवार राहणार अरण तालुका माढा जिल्हा सोलापूर व अजय बंडू पवार राहणार अरण तालुका माढा जिल्हा सोलापूर तसेच मोहन कुंभार राहणार मोडनिंब तालुका माढा जिल्हा सोलापूर यांना आपली व्यवसायासाठी पैशाची गरज आहे असे सांगितले असता तीन टक्के व्याजदराने आम्ही पैसे देतो व आमचा तो व्यवसाय आहे असे सांगितले त्यानंतर त्या टेलरिंग लेडीज शॉपी व्यवसाय करणारे तसेच तरडगाव येथील महानुभाव पंथाचे संन्याशी यांच्या खात्यावर सुरुवातीला चार जून २०२१ रोजी पन्नास हजार रुपये अशी जसा जसा व्यवसाय उभा करण्यासाठी संतोष बलभीम पवार यांच्याकडून संन्याशी यांच्या खात्यावर रक्कम घेतली नंतर टेलरिंग व लेडीज शॉपी मालक यांना जशी गरज लागेल.तशी त्या तिन्ही खाजगी सावकारांकडून ऑनलाईन सहा लाख ९२ हजार रुपये एकूण रक्कम घेतली.ऑनलाइन घेतली. ऑनलाइन घेण्याचे कारण विचारले तर ते खाजगी तिन्ही सावकार म्हणाले की आम्हाला पुरावा म्हणून लागतो.त्यानंतर दोन ते अडीच वर्षाच्या कालावधीत त्यांनी टेलरिंग लेडीज शॉपी व्यवसाय करणारे तसेच महानुभाव पंथाचे संन्याशी तसेच मित्रमंडळी यांच्या खात्यावर रोख स्वरूपात असे आजपर्यंत त्या खाजगी तिन्ही सावकारांना आतापर्यंत साडे चौदा लाख रुपये दिलेले आहेत तसेच ते अजूनही दहा लाख रुपये द्या अशी धमकी देत आहेत.धमकावत आहेत. त्रासाला वैतागून त्या टेलरिंग लेडीज शॉपी व्यवसाय करणे यांनी आपले घरदार सोडून त्यांनी ३०/८/२०२२ रोजी घरदार सोडले होते. त्याची मिसिंग केस देखील लोणंद पोलीस स्टेशनला दाखल आहे. या तिन्ही खाजगी सावकारांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, असे सुध्दा पवन धायगुडे यांनी म्हटलेले आहे.

# दिव्यांग निधी खर्चात नसरापूरमध्ये अनियमितता

## २०१४-२३ मधील ३ लाख ६४ हजार ९९२ निधी दिलाच नाही

आधुनिक केसरी न्यूज

**नसरापूर :** ग्रामपंचायतीने दिव्यांग कल्याण निधीमध्ये अनियमितता करून १८ दिव्यांग लाभार्थीना लाभापासून वंचित ठेवले आहे. नसरापूर ग्रामपंचायतीच्या अधिकारी आणि पदाधिका-यांनी २०१४-१५ ते २०२२-२३ या कालावधीतील ३ लाख ६४ हजार ९९२ रुपयांच्या निधीचा लाभ दिव्यांगाना दिलाच नाही, तर कागदी घोडे नाचवत आणि वरिष्ठांच्या मार्गदशनाचे नावाखाली वेळकाढूपणा केला असून, वरिष्ठ अधिकारी कनिष्ठांना पाठीशी घालत असल्याचे दिसून येत आहे. अशा कामचुकार अधिका-यांवर गुन्हे दाखल करून शासकीय नियमानुसार कारवाई करण्याची मागणी सोमनाथ उकिरडे यांनी केली आहे. महाराष्ट्र राज्य शासन निर्णय २५ जून २०१८ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामपंचायतीच्या एकूण स्व-उत्पन्नातील दिव्यांगांच्या विकासासाठी ३ टक्के, ५ टक्के निधी दिव्यांग लाभार्थींच्या वैयक्तिक व सामूहिक कल्याणासाठी

> भोर तालुका गटविकास अधिकारी किरणकुमार धनवडे यांनी दि. ११ नोव्हेंबर २०२३ रोजी ग्रामपंचायत कार्यालयात प्रत्यक्ष भेट देऊन २०१४ ते २०२३ या कालावधीतील दिव्यांग निधीची माहीती घेऊन ३ लाख ६४ हजार ९९२ इतका निधीचा अनुषेश बाकी असल्याचे कबुल केले असून, हा निधी नियमानुसार खर्च करण्याच्या सुचना नसरापूर ग्रामपंचायतीला दिल्या आहेत नसरापूर ग्रामपंचायतीकडे दिव्यांगांच्या निधीचा खर्चाची माहीती २०२१ पासून विचारत असून, त्याला शासकीय कर्मचा-यांनी टोलवाटोलवी करत २०२३ साल उजाडले. वेळेवर माहिती तर दिली नाहीच, केवळ कागदी घोडे नाचवत वेळकाढू धोरण अवलंबले आहे.
>
> **- सोमनाथ उकिरडे, सामाजिक कार्यकर्ते, नसरापूर**
>
> २०१४-१५ पासुन ते २०२२-२३ या कालावधीतील दिव्यांगांना ३ आणि ५ टक्के वैयक्तिक लाभाचा निधी तत्कालिन आणि विद्यमान कार्यकारी पदाधिका-यांच्या निर्णयानुसार खर्च करण्यात आला असून, उर्वरीत सार्वजनिक स्वरूपाचा लाभाचा निधी खर्च करणे अद्याप बाकी आहे. हा निधी खर्च करण्याबाबत विद्यमान कार्यकारी पदाधिकारी मासिक सभेत निर्णय घेऊन मार्च २०२४ च्या आत खर्च करणार आहे.
>
> **-विजयकुमार कुलकर्णी, ग्रामविकास अधिकारी, नसरापूर**

१०० टक्के खर्च करणे बंधनकारक आहे तसेच लेखासहिता २०११ ला अधिन राहून हा खर्च पूर्ण करणे अपेक्षित आहे; परंतु नसरापूर ग्रामपंचायतीने २०१४-१५ ते २०२२-२३ या कालावधीत ३ लाख ६४ हजार ९९२ इतका निधी कमी खर्च केला आहे. या निधी खर्चाबाबत वेळोवेळी शासकीय लेखापरीक्षणात त्रुटी दाखविल्या. असताना ग्रामपंचायत अधिकारी आणि पदाधिकारी यांनी टोलवाटोलवी करून दिव्यांगांना न्याय हक्कापासून वंचित ठेवले आहे. याबाबत नसरापूर (ता. भोर) येथील सामाजिक कार्यकर्ते सोमनाथ उकिरडे यांनी २०२१ पासून या बाबीचा पाठपुरावा केला असता ही सत्य स्थिती उजेडात आली आहे.




# डब्ल्यूआयआरसीचा 'ट्रेन अर्न अँड लर्न' कोर्स वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** वाणिज्य शाखेचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या 'ट्रेन अर्न अँड लर्न' या कोर्सविषयी द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटन्ट्स ऑफ इंडियाच्या वेस्टर्न इंडिया रिजनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष सी.ए. अप्रिय काबरा यांनी गुरुवार दिनांक ११ जानेवारी रोजी पत्रकार परिषदेत सविस्तर माहिती दिली. काबरा म्हणाले की, आमच्या संस्थेच्या देशभरात एकूण ३६ शाखा आहेत. संस्थेतर्फे 'ट्रेन अर्न अँड लर्न' हा रोजगाराभिमुख कोर्स सुरु करीत आहोत. या कोर्सला वाणिज्य शाखेत शिक्षण घेत असलेले विद्यार्थी-विद्यार्थिनी प्रवेश घेऊ शकतात. हा कोर्स एकूण ३६ तासांचा असून त्याची अवधी १२ दिवस आहे. दररोज तीन तास या कोर्सअंतर्गत प्रवेशित विद्यार्थी-विद्यार्थिनींना शिक्षण दिले जाईल. कोर्सकरिता प्रत्येकी ३५० रुपये फी आकारली जाईल. कोर्स यशस्वीरीत्या पूर्ण केल्यानंतर संस्थेतर्फे इंटर्नशिपची संधी मिळेल. हा कोर्स पूर्ण केलेलया विद्यार्थी-विद्यार्थिनींना सी.ए. क्षेत्राशी निगडीत व विविध कंपन्या, आस्थापना या ठिकाणी नोकरी मिळू शकेल. या कोर्सला प्रवेश घेऊन विद्यार्थी-विद्यार्थिनी आपले भविष्य उज्वल बनवू शकतील. या पत्रकार परिषदेला वेस्टर्न इंडिया रिजनल कॉन्फरन्सचे सेक्रेटरी सौरभ अजमेरा, धुळे सी.ए. शाखेचे ब्रांच नॉमिनी अंकित अग्रवाल, खजिनदार केतन सईया उपस्थित होते.

# गोदावरी खोरे पाणीप्रश्नावर राजकारण करणाऱ्यांना चपराक

## पश्चिम वाहिनी नदीचे पाणी गोदा खोऱ्यात वळविण्यासाठी आता न्यायालय निर्णय घेणार

आधुनिक केसरी न्यूज

राज्य सरकारने स्थापन केलेल्या समितीच्या अहवालानुसार कोकणातील नार – पार, दमणगंगा, वैतरणा, उल्हास नदी खोऱ्यातून गोदावरी खोऱ्यात प्रवाही वळण योजनांद्वारे ; तसेच उपसा नदीजोड, वळण योजनांद्वारे एकूण ८९ .९२ टी .एम .सी .पाणी वळविण्याबाबत आखणी करून त्याबाबत शिफारस केली आहे . मात्र निवडणुका पाहून केवळ घोषणा करण्यापलीकडे काही होताना दिसत नाही म्हणून हि जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे . **–नानासाहेब जवरे, सामाजिक कार्यकर्ते, कोपरगाव .**

पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील दुष्काळ हटवण्यासाठी पश्चिम घाटमाथ्यावरील सर्व अपूर्ण सिंचन योजना पूर्ण करणार असल्याच्या घोषणा शेतकऱ्यांना नवीन नाही . मात्र प्रत्यक्षात हा प्रकल्प कधी पूर्ण होणार याबाबत निळवंडे प्रकल्पाबाबत कोणीही नेता अथवा प्रशासकीय अधिकारी स्पष्ट बोलत नाही . त्यामुळे यावर एक घाव दोन तुकडे करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब जवरे आणि विक्रांत काले यांनी निर्णय घेतला आहे **. वकील अजित काळे, उपाध्यक्ष, प्रदेश शेतकरी संघटना**

पश्चिम वाहिनी नदीचे पाणी गोदावरी खोऱ्यात आणण्यासाठी सुमारे ४० वर्षांपासून प्रयत्न सुरु असल्याचे बोलले जाते मात्र त्यातील मिळकत शून्य आहे . याउलट तिन्ही जिल्ह्यातील पाणीप्रश्न तीव्र होत असून संघर्ष वाढीला लागत आहे . त्यामुळे याचिकेबाबत अ .नगर– नाशिक, मराठवाडा, निळवंडे कालवा कृती समितीचे कार्यकर्ते, शेतकरी नक्कीच समाधानी आहेत . शेतकऱ्यांचा दुष्काळ हटविण्यासाठी हा एकमेव पर्याय आहे **. वाल्मिक सांगळे, जिल्हाध्यक्ष, रयत क्रांती संघटना**



**किरणकुमार आवारे**

**निफाड :** गोदावरी खोऱ्यातील पाण्यावरून नगर - नाशिक विरुद्ध मराठवाडा असा संघर्ष गेल्या काही दशकापासून धुमसत आहे. गोदावरी खोरे हे पाण्याच्या बाबतीत तुटीचे खोरे आहे. पाण्याचा उपलब्धतेच्या मर्यादा लक्षात घेता पश्चिम वाहिनी नद्यांचे कोकणात वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याशिवाय पर्याय नाही. मात्र सरकार निवडणुका पाहून घोषणा करण्यापलीकडे काहीही कृती करत नसल्याचे वारंवार उघड होत आहे. त्यामुळे हे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार नानासाहेब जयराम जवरे व विक्रांत रुपेंद्र काले यांनी नुकतीच शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष वकील अजित काळे यांच्या माध्यमातून मुंबई उच्च न्यायालयाच्या छ. संभाजीनगर खंडपिठात जनहित याचिका (क्रं.१२१७/२०२४) दाखल केली आहे. त्यामुळे गोदावरी खोरे पाणीप्रश्नावर राजकारण करणाऱ्यांना चपराक बसणार असून पश्चिम वाहिनी नदीचे पाणी गोदा खोऱ्यात वळविण्यासाठी आता न्यायालय निर्णय घेणार आहे.

उत्तर कोकणातील नार-पार, अंबिका औरंगा, दमणगंगा, वैतरणा व उल्हास नदी उपखोऱ्यात ३१७ टीएमसी अतिरिक्त पाणी शिल्लक आहे. पश्चिम वाहिनी खोऱ्यातील (कोकण) अतिरिक्त पाणी मराठवाड्यात वळवण्यासाठी प्राथमिक अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने सन २००१ व सन २०१९ साली समिती स्थापन केली होती. या समितीच्या अहवालानुसार कोकणातील नार-पार, दमणगंगा, वैतरणा, उल्हास नदी खोऱ्यातून गोदावरी खोऱ्यात प्रवाही वळण योजनांद्वारे; तसेच उपसा नदीजोड, वळण योजनांद्वारे एकूण ८९.९२ टी.एम. सी. पाणी वळविण्याबाबत आखणी करून त्याबाबत शिफारस केली आहे. त्यानुसार जवळपास ७.४ टी.एम.सी.पाणी प्रवाही वळण योजनांद्वारे; तर १५.५ टी.एम.सी.पाणी प्रमुख उपसा वळण योजनांद्वारे असे एकूण मिळून २२.९ टी. एम. सी. पाणी वळविण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. यासाठी प्रवासी वळण योजनेद्वारे एकूण ३० योजना प्रस्तावित असून, यापैकी १४ योजना पूर्ण केल्या असल्याच्या घोषणा निवडणुका पाहून केल्या जात आहेत. त्याद्वारे १.३५ टीएमसी पाणी वळविले जाईल. ११ भविष्यकालीन योजनांद्वारे ४.९८ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे प्रस्तावित असल्याच्या घोषणा ऐकून शेतकऱ्यांना आता विट आला आहे. मुख्य म्हणजे प्रमुख उपसा वळण योजनेद्वारे जवळपास १५.५५ टी.एम.सी.पाणी वळविण्याचे प्रस्तावित आहे. यात प्रवरा खोऱ्यातील घाटघर जवळील नाला तसेच साम्रद गावाजवळील साम्रद नाला येथे वळण बंधारे बांधून पश्चिमेकडे जाणारे पाणी पूर्वकडे वळविण्याची योजना आहे. या बंधाऱ्याद्वारे एकूण १२८७ द. ल.घ.फूट अतिरिक्त पाणी वळविणे शक्य होणार असून त्याचा निळवंडे प्रकल्पासाठी फायदा होणार असल्याचे बोलले जात आहे. तर कोकणातून समुद्रात वाहून जाणारे १६७ टी.एम.सी.पाणी गोदावरी खोऱ्यात वळवून मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्यात येणार आहे. तसेच वैनगंगा-नळगंगा योजनेअंतर्गत ४८० किमीचा बोगदा तयार करून वैनगंगा नदीचे पाणी थेट पूर्व विदर्भ आणि पश्चिम विदर्भात आणले जाणार आहे. यासोबतच पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील दुष्काळ हटवण्यासाठी त्या भागातली सर्व अपूर्ण सिंचन योजना पूर्णत्वास घेऊन जाण्याचा प्रयत्न असणार असल्याच्या घोषणा या भागातील शेतकऱ्यांना नवीन नाही. मात्र प्रत्यक्षात हा प्रकल्प कधी पूर्ण होणार याबाबत निळवंडे प्रकल्पाबाबत कोणीही नेता अथवा प्रशासकीय अधिकारी स्पष्ट बोलत नाही. त्यामुळे यावर एक घाव दोन तुकडे करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते नानासाहेब जवरे आणि विक्रांत काले यांनी निर्णय घेतला व त्या दृष्टीने अनेक वर्षांच्या मेहनतीने कागदपत्रे जमवले व त्याबाबत नुकतीच तयारी पूर्ण झाली. शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष वकील अजित काळे यांच्याशी विचार विनिमय व एक बैठक छ. संभाजीनगर येथे संपन्न होऊन त्यावर नुकतीच निळवंडे (तथा ऊर्ध्व प्रकल्प-२) सारखी जनहित याचिका दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या नुसार दि.१० जाने.मुंबई उच्च न्यायालयाच्या छ. संभाजींनगर येथील कोर्ट क्रं. एकचे न्या. मा.रवींद्र घुगे व न्या.मा.वाय.जी.खोब्रागडे यांचे समोर ही जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. त्याची सुनावणी आगामी गुरुवार दि.१८ जानेवारी २०२४ रोजी संपन्न होणार असल्याची माहिती वकील अजित काळे यांनी दिली आहे.

# प्रा. वा. ना. आंधळे सूर्योदय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटक

आधुनिक केसरी न्यूज



**जळगाव :** नाशिक शहरातील साहित्य क्षेत्रातील अग्रेसर सूर्योदय सर्वसमावेशक मंडळाच्या वतीने मंडळाच्या एकविसाव्या वर्धापन दिनानिमित्त येत्या मार्च मध्ये जळगाव येथे एक दिवसीय राज्यस्तरीय एकविसावे सूर्योदय मराठी साहित्य संमेलन सुप्रसिद्ध लेखक,गजलकार प्रदीप निफाडकर यांच्या अध्यक्षतेखाली होऊ घातलेले असून या संमेलनाचे उद्-घाटन सुप्रसिद्ध कवी प्रा वा ना आंधळे (एरंडोल) यांच्या हस्ते होणार असल्याचे मंडळाचे अध्यक्ष सतीश जैन यांनी कळविलेले आहे.

यापूर्वी सर्वश्री. प्रा.जवाहर मुथा, अरूण नारखेडे, विद्याधर पानट, प्रा.डॉ. सुनील मायी सुशील पगारिया, प्रा डॉ म. सु. पगारे, वि .भा. नेमाडे, माजी न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर, अशोक कोतवाल, भगवान भटकर, सौ.माया दिलीप धुप्पड ,सुभाषचंद्र वैष्णव, प्रा .विश्वास वसेकर, डॉ. विजया वाड, डॉ नरसिंह परदेशी, रवींद्र पांढरे,शशिकांत हिंगोणेकर,चंदुलाल शहा, प्रा डॉ सतीश बडवे, प्रा डॉ पी विठ्ठल या मान्यवरांनी साहित्य संमेलनाचे उद्-घाटन केलेले आहे. संमेलन यशस्वीतेसाठी शहराध्यक्ष साहेबराव पाटील, कार्याध्यक्ष प्रविण लोहार, उपाध्यक्ष विनोद निळे, सचिव डी. बी. महाजन, कु. गायत्री पाटील प्रयत्नशील आहेत. सदर संमेलनाची तारीख यथावकाश कळविण्यात येईल.




# शिवसेना उबाठाकडून नार्वेकरांचा निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** भारतीय संविधानाला, न्यायव्यवस्थेला हारताळ फासणाऱ्या राहुल नार्वेकरांच्या विरोधामध्ये शिवसेना उबाठा च्या पदाधिकाऱ्यांनी काळे झेंडे व तोंडावर काळी पट्टी बांधून जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. विधानभवनात झालेल्या अंतिम सुनावणीत पात्रतेच्या लढाईमध्ये हेतू पुरस्कार सुप्रीम कोर्टाने निरीक्षणे नोंदउन अपात्रतेच्या निकालासाठी जी मार्गदर्षक तत्वे संगितली होती त्यास हरताळ फासून, शिवसेना प्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे व निष्ठावंत शिवसैनिकांचा विश्वासघात करून यांच्या पाठीत खांजिर खुपसून व आपल्या आकांनी लिहून दिलेली स्क्रिप्ट वाचून दाखवून खऱ्याचे खोटे व खोट्याचे खरे करणाऱ्या, नार्वेकर यांचा लोणार येथील बस स्टँड परिसर व तहसील कार्यालयावर काळे झेंडे दाखवून व तोंडावर काळ्या पट्ट्या बांधून निषेधाचे बॅनर झळकावून जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा संघटक डॉ.गोपाल बशिरे, तालुकाप्रमुख एडवोकेट दीपक मापारी, शहर प्रमुख गजानन जाधव, तालुका संघटक कैलास अंभोरे, तालुका उपप्रमुख श्रीकांत नागरे, परमेश्वर दहातोंडे, संचालक कृ.उ.बा.स. विजय मोरे, तेजराव घायाळ, नगरसेवक शाम राऊत,तालुका सहसंघटक सुभाष पुरी, शहर उपप्रमुख लूकमान कुरेशी, युवा तालुकाधिकारी जीवन घायाळ, युवा शहरप्रमुख श्रीकांत मादनकर, विभाग प्रमुख सुदन अंभोरे सर, राजू बुधवत, अश्रुबा धारकर, यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसैनिक उपस्थित होते.

# महाधम्मध्वज महापदयात्रा धम्म चळवळीला बळकटी देणारी : दीपक कदम

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** जागतिक धम्मध्वज दिनानिमित्त भदंत पंय्याबोधी थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने काढण्यात आलेली महाधम्मध्वज महापदयात्रा धम्म चळवळीला बळकटी देणारी आहे असे प्रतिपादन आंबेडकरवादी मिशनचे संस्थापक दीपक कदम यांनी केले. ते पदयात्रेला समारोप प्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी मंचावर येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक भदंत पंय्याबोधी थेरो आणि भिक्खू संघासह उद्घाटक म्हणून रिपब्लिकन हक्क परिषदेचे संस्थापक अध्यक्ष रमेशदादा सोनाळे, आंबेडकरी नेते बापुराव गजभारे, रिपब्लिकन सेनेचे माधवदादा जमदाडे, प्रशांत इंगोले, प्रफुल्ल सावंत, सुभाष रायबोले, संदीप मांजरमकर, प्रभू सावंत, प्रा. साहेबराव इंगोले, प्रा. एस. एच. हिंगोले, प्रा. विनायक लोणे, प्रज्ञाधर ढवळे, प्रशांत गवळे आदींची उपस्थिती होती. जागतिक धम्मध्वज दिनानिमित्त तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्रातून १४४ फुटांच्या पंचरंगी धम्मध्वजाची मिरवणूक ढोल ताशाच्या गजरात खुरगाव पाटी, पासदगाव, नेरली फाटा, भावसार चौक, तरोडा नाका, राज कॉर्नर ते फुले पुतळा, भ. गौतम बुद्ध यांच्या पुतळ्याची नियोजित जागा शिवाजी नगर, कलामंदिर मार्गे शहरातील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात आली. या पदयात्रेत हजारो बौद्ध उपासक उपासिका सहभागी झाले होते. या पदयात्रेचा समारोप रेल्वेस्टेशन नजीकच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ करण्यात आला. भंते शिलरत्न यांनी उपस्थितांना त्रिसरण पंचशील दिले.

# पार्थ भालेरावचे दिग्दर्शनात पदार्पण; 'हम दोनो और सूट' नाटकाचे केले दिग्दर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** केन थेम्बा यांच्या लघुकथेवर आधारित 'हम दोनो और सूट' हे एकपात्री नाटक लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या नाटकाच्या निमित्ताने अभिनेता पार्थ भालेराव दिग्दर्शनात पदार्पण करत आहे. निरंजन पेडणेकर यांचे लेखन असणारे हे नाटक रितिका श्रोत्री सादर करणार आहे. दिग्दर्शनाबद्दल पार्थ भालेराव म्हणतो, " मला ही कथा प्रचंड भावली. १९७०च्या काळातील ही कथा आहे. ही गोष्ट एका अशा कपलची आहे, ज्यांचे नवीनच लग्न झाले आहे, एकमेकांवर प्रेम आहे. तरी बायको नवऱ्याची फसवणूक करत आहे. आता ती असे का करते, हे नवऱ्याला कळल्यावर त्याची प्रतिक्रिया काय असते, या गोष्टीचा त्यांच्या नात्यावर काय परिणाम होतो, हे नाटकात पाहायला मिळणार आहे. नातेसंबंध आणि फसवणूक यावर भाष्य करणारे हे नाटक असून यात प्रेक्षकांना ब्लॅक कॉमेडी अनुभवायला मिळणार आहे. रितिकाने आपल्या अभिनयाने या व्यक्तिरेखेत रंगत आणली आहे. ही एक क्लासिक कलाकृती आहे. याचा पहिला प्रयोग १३ जानेवारी रोजी पुण्यातील दि बॉक्स येथे ९ वाजता होणार आहे.




रितिका श्रोत्री म्हणते, "यापूर्वीही मी एकपात्री प्रयोग केला आहे. एका जागी प्रेक्षकांना १ तास खिळवून ठेवणे, हे मोठे कौशल्य आहे आणि ही ताकद कथेमध्ये असते. प्रत्येक क्षणी ही कथा अनपेक्षित वळण घेते. त्यामुळे प्रेक्षकांना उत्सुकता लागून राहाते. आता पुढे काय होणार याची. ही कथाच अतिशय सुंदर आहे.या नाटकात मी पाच व्यक्तिरेखा साकारल्या आहेत.

# व्यसनापासून दूर राहावे : पो. नि. वाघमोडे

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ़**

**पिशोर :** कन्नड तालुक्यात पिशोर पोलीस ठाण्याचे सपोनि देविदास वाघमोडे यांना नुकताच सुलक्ष्मी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था व माणुसकी रुग्णसेवा समुहाच्या वतीने सेवागौरव पुरस्कार मिळाला त्यानिमित्ताने कन्नड तालुक्यातील नादरपूर येथे दि.८ मंगळवार रोजी सकाळी ९ वाजता त्यांच्या जाहीर सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत तसेच ग्रामस्थ्यांच्या वतीने करण्यात आले होते. सत्कार समारंभ कार्यक्रमात बोलतांना सपोनि देविदास वाघमोडे यांनी सांगितले की,समाजातील तरुणांनी व्यसनापासून दूर राहावे,सर्व घटकातील तरुणाचे लग्न एकाच ठिकाणी व्हावे त्यांचा वेळ व पैसा वाचावा या हेतूने गावात सार्वजनिक मंगल कार्यालय, गायरान पडीत जमिनी गाव विकासासाठी गावातील लोकांनीच खरेदी करून बेरोजगारांना रोजगार मिळेल असे उद्योग, सामाजिक उपक्रम राबवावे, व्यायाम शाळा, सैनिकी प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी प्रयत्न करावे,त्याच सोबत तरुण मूलांनी अभ्यासाची आवड़ निर्माण करने हे सर्वात महत्वपूर्ण आहे, अभ्यास ही वस्तु आहे त्यात कढ़ीच वाटा होत नाही अभ्यास किती ही केला तर तो वाया जात नाही, मानवी जीवनात आपन आपल्या प्रोपेर्टी मध्ये हिस्सा मांगतो, मात्र आपन जर शिक्षन केले आणि महेनत व शिक्षनाच्या जोरावर प्रगति केली तर अस कोणीही म्हनार नाही की तुझ्या शिक्षनात वाटा दे, यामुळे सर्वात जास्त शिक्षनावर भर देण्याची गरज आहे. त्यावेळेस जि. प. प्रशासन अधिकारी दिलीपराव निकम, ग्रामविकास अधिकारी एस आर बनकर, मा. सरपंच गणेश निकम, लक्ष्मण बळी,आप चे जिल्हाध्यक्ष सुभाष निकम, उपसरपंच सागर निकम,रामदास निकम,भगवान निकम, बिट जमादार सुनील भिवसने, कैलास निकम,बाबुराव निकम, भागीनाथ मोकासे, सुनिल निकम,ग्रामपंचायत सदस्य, तंटामुक्त अध्यक्ष, सदस्य, ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन लक्ष्मण बळी यांनी केले तर आभार पोपट निकम यांनी मांडले.

# माझं काय चुकलं, मला न्याय मिळेल का ?

## गावगुंडांचा बळी ठरलेल्या मयत विशालसाठी शिवसेनेसह विद्यार्थ्यांची पोलिस अधीक्षक कार्यालयावर धडक

आधुनिक केसरी न्यूज

**इमरान खान पठाण**

**अकोला :** शिकवणी वर्ग परिसरात विशाल झाटे या विद्यार्थ्यांचा गावगुंडानी नाहक बळी घेतला. त्यामुळे दहशतीत असलेल्या विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करीत व पुन्हा अशी घटना अकोल्यात घडू नये यासाठी पोलिसांनी उपाययोजना करण्याच्या मागणीसाठी हजारो विद्याध्यांसह शिवसेनेच्या ठाकरे गटाने पोलिस अधीक्षक कार्यालयावर धडक दिली. विद्यार्थी व शिवसेनेच्या वतीने पोलिस अधीक्षकांना निवेदनही देण्यात आले. बुलढाणा जिल्ह्यातून अकोलामध्ये शिक्षण घेण्यासाठी आलेला विद्यार्थी विशाल झाटे याचा कृषिनगर भागातील गावगुंडांनी धारदार शस्त्राने काहीही कारण नसताना खून केला. मित्राने वाढदिवसाचे गिफ्ट मागितले म्हणून निष्पाप विशाल झाटे या विद्यार्थ्यांचा बळी घेण्यात आला. नशेखोर समाजकंटकांच्या हातून घडलेल्या अत्यंत भयावह घटनेने शिकवणी वर्ग परिसरातील विद्यार्थी व त्यांचे पालक दहशतीत आहेत. अशा घटनांमुळे सामाजिक स्वास्थ्यासह शैक्षणिक स्वास्थ्य बिघडत आहे. या घटनेतील आरोपींना कठोर शिक्षा व्हावी आणि पुन्हा अशी घटना घडू नये म्हणून यांनी घेतला सहभागी ठाकरे गटाचे आमदार नितिन देशमुख यांच्या नेतृत्वात निघालेल्या मोर्चात शिवसेना जिल्हा प्रमुख गोपाल दातकर, सेवकराम ताथोड, गजानन दाळू गुरूजी, संजय गावंडे, हरिदासजी भदे, शहर प्रमुख राजू मिश्रा, राहूल कराळे, अभय खुमकर दीपक बोचरे, अतुल पवनीकर आदी या मोर्चात सहभागी झाले होते.





**पोलिसांप्रमाणे काम करणार शिवसेनेची हेल्पलाईन : आ. नितीन देशमुख**
पोलिस अधीक्षक कार्यालयावर काढण्यात आलेल्या मोर्चानंतर विद्यार्थ्यांना संबोधित करताना आमदार नितीन देशमुख, माजी आमदार गजानन दाळू गुरुजी, प्रा. प्रकाश डवले, बुलडाणा येथे आलेले शिवसेना पदाधिकारी नरेंद्र खेडेकर आदींनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शिवसेना सदैव्य तत्पर राहील, असे आश्वासन दिले. त्यासाठी शिवसेनेची हेल्पलाईन तयार करण्यात येत आहे, असे आमदार देशमुख यांनी सांगितले.

**विशालच्या वडिलांच्या डोळ्यातून आले अश्रू :** विशाल झाडेचे वडील बुलडाणा जिल्ह्यातून खास या मोर्चात सहभागी झाले होते. माझ्या मुलासोबत जे घडले ते इतर कुणाच्याही मुलासोबत घडू नये यासाठी मुलाच्या जाण्याचे दुख : बाजूला सारून विशालचे वडील मोर्चात सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांना संबोधित करताना मुलाच्या आठवणीने त्याच्या डोळ्यातून अनु आले, विशालच्या वडिलांसोबतच वर्षभरापूर्वी एका विद्यार्थ्याला फाशी देवून मारल्याचा संशय व्यक्त करीत त्या विद्यार्थ्यांचे पालकही उपस्थित होते.

**पोलीस अधिक्षक कार्यालयावर धडकला मोर्चा :** पोलिसांनी उपाययोजना कराव्यात या मागणीसाठी पाच हजारांवर विद्यार्थ्यांचा सहभाग असलेला शिवसेनेचा मोर्चा आमदार नितीन देशमुख यांच्या नेतृत्वात पोलिस अधीक्षक कार्यालयावर धडकला. जवाहरनगर चौकातून दुपारी १ वाजता मोर्चाला सुरुवात झाली. सिव्हिल लाईन्स चौक, नेहरू पार्क मार्गे पोलिस अधीक्षक कार्यालयावर मोर्चा पोहोचल्यानंतर तेथे शिवसेना पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित केले, या मोर्चात अकोला शहरातील शास्त्री नगर, रणपिसे नगर, राऊतवाडी, जवाहर नगर, हनुमान नगर, रामनगर, जठारपेठ, लहान उमरी, शासकिय दूध डेअरी परिसर, गौरक्षण रोड त्याचप्रमाणे जुने शहरातील डाबकी रोड या परिसरात अनेक कोचिंग क्लासचे विद्यार्थी सहभागी झाले होते. अकोला शहरात गुन्हेगारी लोकांसोबत अनेक पोलीस कर्मचारी यांचे लागेबांधे आहेत तसेच हे लोक अवैध व्यवसायात भागीदार आहेत. जे कर्मचारी शहरात अनेक वर्षापासून ठाण मांडून आहेत त्यांची तत्काळ शहराबाहेर बदली करण्यात यावी.

### या मागण्यांचे दिले निवेदन


टवाळखोर मुलांचा बंदोबस्त पोलिसांनी करावा. त्यासाठी ताबडतोब खास पथकाची नेमणूक करावी, सिव्हिल ड्रेससह पोलिसांची गस्त वाढवून मुलींवरील होणारे अत्याचार थांबवावे. कोचिंग क्लासेसच्या परिसरात अनेक कॅफे सेंटर आहेत. या कॅफे सेंटरच्या माध्यमातून अल्पवयीन मुलांसह मुली तसेच वयात आलेली मुलेही अश्लील चाळे करतात. अशा कॅफे सेंटरवर धाडी टाकून ते कायमस्वरूपी बंद करण्यात यावे. अकोला शहरात तथा जिल्हयात अनेक ठिकाणी रस्त्यावर राजरोसपणे जुगार, अवैधरित्या दारू विक्रीसारखे धंदे सुरू आहेत. ते बंद करण्यात यावे. जिल्ह्यामध्ये महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. अशा अपराध्यांवर वचक राहील व त्यामुळे समाजातील अशा प्रवृत्तीच्या लोकांवर पोलिसांची दहशत निर्माण होईल यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. महिला मुलींच्या सुरक्षेसाठी दामिनी पथकांमध्ये वाढ करण्यात यावी. शिकवणी वर्गाच्या मुख्य मार्गावर पोलिस चौकी लावून शिकवणी वर्गाच्या परिसरात महिला व पोलिस कर्मचारी यांची शिकवणी वर्ग चालू असेपर्यंत गस्त ठेवण्यात यावी. संपूर्ण शहरात सीसीटीव्ही कॅमेरे लावून वॉर रूम स्थापन करून गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवण्यात यावे.
= विशाल झाटे खून प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून ॲड .उज्वल निकम यांची नियुक्ती करण्यात यावी.

# 'कष्टाच्या वाटा'

आधुनिक केसरी



अय्युब पठाण लोहगावकर हे मराठी बालसाहित्यातील सुपरिचित असे नाव असून बालकथा, बालकविता या साहित्य प्रकारामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. बालकुमारांसाठी लेखन करत असताना त्यांचे भावविश्व, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांचे छंद आणि एकंदरीतच त्यांचे सामाजिक पर्यावरण याची जाण आणि भान लेखकाला असणे अपेक्षित असते. अय्युब पठाण लोहगावकर यांचे बालसाहित्य वाचल्यानंतर बालविश्वासी रममाण झालेला हा बालसाहित्यिक आहे याची प्रचिती येते. कथा हा आबालवृद्धांना आवडणारा साहित्यप्रकार आहे. लहान मुलांना तर गोष्टी ऐकायला खूप आवडते. अय्युब पठाण लोहगावकर हे शिक्षक असल्याने मुलांची नस ओळखून त्यांनी मुलांसाठी, " कष्टाच्या वाटा " हा बालकथा संग्रह साकारलेला आहे." कष्टाच्या वाटा " या बाल कथासंग्रहातील, वाचन, गुरुची ममता, अनोखं वृक्षारोपण, दान, झुमरी , जत्रा या आणि इतर कथा मुलांच्या जीवनातील आवडीनिवडी छंद आणि शिक्षण संस्कार या बाबींवर प्रकाश टाकतात. मुलांना बोध देऊन मुलांना सुसंस्कारित करतात. योग्यायोग्य ,बरेवाईट याची मुलांना जाणीव करून देतात. तसेच मुलांना छंदाची उपासना करण्याची शिकवण देतात. मैदान वाचवूया, या चिमण्यांनो, घामाची पेरणी, मायाळू आजी,नागपंचमीचा सण, सुगी, गुलाब अन् काटे, उपकाराची फेड, गावचा ओढा, कौतुकाची थाप, सत्कर्माचे फळ, वीर जवान या कथातून लेखकाने एक प्रकारे संस्कार पेरणीच केलेली आहे. या बालकथा मुलांचे मनोरंजन तर करतीलच पण त्यांचे भावजीवन सुद्धा समृद्ध करतील यात शंका नाही. तसेच शालेय स्तरावर मुलांना कथाकथन या बौद्धिक स्पर्धेसाठी सुद्धा या कथा उपयुक्त ठरतील असा मला विश्वास वाटतो. मुलांच्यासाठी अतिशय छान असा, " कष्टाच्या वाटा " हा बालकथा संग्रह लिहिल्याबद्दल लेखकाचे मनःपूर्वक अभिनंदन व पुढील साहित्यिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!




**डॉ. श्रीकांत पाटील**
**राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक**
**राज्य शासन पुरस्कार प्राप्त लेखक.**
**9834342124**

# महिलेवर अत्याचार, युवकाविरुध्द ॲट्रोसिटी व बालत्काराचा गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील देवळांना शिवारात महिला कापुस वेचणी करत असताना त्यांच्या सोबत युवकाने अत्याचार केल्याची घटना घडली.तक्रारीवरून आरोपी विरूद्ध अत्याचार व बालत्काराचा गुन्हा खुलताबाद पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. आरोपी टाकळी राजेराय येथील शेख समद शेख असद यांने महिन्याभरपुर्वी पीडीत महिला देवळाणा शिवारात कापूस वेचणी करत असताना बळजबरीने पिडितावर अत्याचार केले.तर कुणाला काही सांगितल्यास पती व तुला जीवे मारण्याची धमकी दिली तर जबरदस्तीने फटफटी वर बसवण्यासाठी दम दिला.याबरोबरच मोबाईलवर वेळोवेळी मॅसेज करत त्रस्त केले असे दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे.फिर्यादीवरून आरोपी विरूद्ध बालत्कार व ॲट्रोसिटी चा गून्हा दाखल करण्यात आला आहे.

# अवैध उत्खनन प्रकरणात मुरूम माफियांना बजावल्या नोटीसा

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** वाळूमाफियांबरोबरच तालुक्यात आता मुरूम माफियांनी धिंगाणा घातला असून पुनर्वसनासाठी संपादीत केलेल्या जमिनीसह सरकारी गायरान जमिनीतून अवैधरीत्या मुरमाची वाहतूक व उत्खनन केल्याप्रकरणी तालुक्यातील बाभुळगावगंगा येथील ३९ जणांना उपविभागीय अधिकाऱ्यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. यामध्ये माजी सरपंच, विद्यमान उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, मंदिराचा पुजारी , जेसीबी, पोकलेन व ट्रक्टर चालकांचा समावेश आहे.

तालुक्यातील नांदूरढोक शिवारातील गट नंबर १७,१८ व १९ या सरकारी गायरान जमिनीतून , बाभुळगावगंगा शिवारातील गट नंबर ३१,३२,३३ व ३५ तसेच गाव पुनर्वसनासाठी संपादीत जमिनीतून व नांदूरढोक शिवारातील गट नंबर ८३ मधून मोठ्या प्रमाणात अवैधरीत्या मुरमाची वाहतूक व उत्खनन करण्यात आले आहे. हे उत्खनन गावातीलच नागरीकांनी केले आहे. याबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त झाल्याने ३९ जणांना उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.
उत्खनन झालेल्या जागेची ईटीएस मोजणी करून या अहवालानुसार आपणास दंड का आकारू नये? शासनाच्या लाखो रूपयांच्या मालमत्तेचे नुकसान केल्याने आपल्या मालमत्तेवर बोजा का चढवू नये? तसेच आपली मालमत्ता खरेदी - विक्री करण्यास प्रतिबंध का करण्यात येऊ नये? असे प्रश्न उपस्थित करून कारणे दाखवा नोटीस देऊन दोन दिवसात खुलासा मागविण्यात आला आहे.

**मुरूम माफियांना बजावली नोटीस :** या कारणे दाखवा नोटीसमध्ये उदय कुंजीर, उमाकांत कुंजीर, योगेश घोडे, विजय कुंजीर, राजेंद्र कुंजीर, जालिंदर कुंजीर, शिवाजी कुंजीर, कारभारी बोरगे, भाऊसाहेब बोरगे, योगेश घंगाळे , संतोष घंगाळे, दत्तात्रय घंगाळे,नाना घंगाळे, रमेश कुंजीर,शरद कुंजीर, सुभाष गायधने, राहुल गायधने ,सतीश बोरगे, भाऊसाहेब कुंजीर,किरण कुंजीर, राजेंद्र बोरडे, चंद्रशेखर बोरडे, नारायण घोडे, चंद्रभान कुंजीर, बाबासाहेब कुंजीर, जगदीश जाधव,नाना जाधव, रवींद्र जाधव, गोकुळ वराडे, योगेश बाजारे, दादासाहेब शिंदे, रामभाऊ शिंदे,किसन शिंदे, दिलीप परदेशी, रोहित परदेशी, कैलास परदेशी, शिवाजी बाजारे या ३९ जणांचा समावेश आहे.

# आरोग्य केंद्रात बीपी गोळ्यांचा तुटवडा, गरीब रुग्ण त्रस्त

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात बीपी गोळ्यांचा तुटवडा असल्याने गरिब रुग्ण त्रस्त परेशान झाले असुण वरिष्ठ कार्यालयाने याकडे जातीने लक्ष घालून तातडीने गोळ्या औषधी उपलब्ध करून देण्याची मागणी रुग्ण तथा नागरिकांतुन होत आहे. बाजार सावंगी येथील आरोग्य केंद्रांतर्गत पाच उपकेंद्रे तर २५ते३०गाव खेड्यांचे आरोग्य या केंद्रावर अवलंबून आहे.तर सर्वत्र बीपी रक्तदाब हायबीपी लोबीपी चे असंख्य रुग्ण झाले आहे. जो तो या बीपीने त्रस्त आहे.यात वरुनच



बीपीचे औषधी गोळ्या येत नसल्याचे चित्र आहे.व याचा त्रास असल्याने नागरिक रुग्ण गाव खेड्यांतून येथील आरोग्य केंद्रांत हेलपाटे लावत आहे.मात्र बीपीचे औषधी गोळ्या नसल्याचे उतर केंद्रांत मीळत असल्याने या संदर्भात सरपंच व दैनिकांच्या प्रतिनिधी कडे अनेक रुग्णांनी तक्रार केली यासंदर्भात आरोग्य केंद्राच्या आरोग्य अधिकारी यांच्या कडे विचारणी केल्यावर त्यांनी खरच बीपीच्या गोळ्यांचा साठा नाही व उपलब्धही नाही यापुर्वीच आम्हीं खाजगीतून खरेदी करून रुग्णांना दिले व आता बीपीचे रुग्ण मोठ्या संख्येने वाढले व औषधी उपलब्ध नाही आम्ही काय करणार ?असे उतर मिळाले आरोग्य केंद्रांतर्गत २५-३०खेडी असल्याने प्रशासनाने तातडीने बीपीच्या गोळ्या उपलब्ध करून द्याव्या असी मागणी रुग्ण तथा नागरिकांतून होत आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन, ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# दुष्काळी परिस्थिती पाहता जिल्ह्याला वाढीव निधी देणार

## उपमुख्यमंत्री अजित पवार : सन 2024-25 चा प्रारूप आराखड्याबाबत बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** मागासलेपणामुळे केंद्राने जिल्ह्याचा समावेश आकांक्षीत जिल्ह्यात केला आहे.पाऊस कमी पडल्याने जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती आहे. जिल्ह्याचे मागासलेपण व दुष्काळी परिस्थिती पाहता जिल्ह्याच्या विकासासाठी सन 2024-25 या वर्षात वाढीव निधी देण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी सांगितले.

10 जानेवारी रोजी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांचे अध्यक्षतेखाली सन 2024-25 चा जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) प्रारूप आराखडा अंतिम करण्यासाठी राज्यस्तरीय बैठकीत धाराशिव जिल्ह्याचा आढावा घेतांना उपमुख्यमंत्री श्री.पवार बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहातून व्हिडिओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून पालकमंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत,जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे,निवासी उपजिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रांजल शिंदे,जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने यांचेसह सर्व यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



पवार म्हणाले,श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचा विकास आराखडा चांगला करण्यात यावा.या आराखडयामध्ये भाविकांना चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्या.भाविकांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी. आराखड्यातील काम करताना चांगल्या वास्तु विशारदाची निवड करावी.तुळजापूर विकास आराखड्यासाठी निधीची अडचण येणार नाही. आराखडाअंतर्गत कामे करताना काहींचे पुनर्वसन करण्याची वेळ आली तर त्यांचे पुनर्वसन करू पण आराखडा चांगल्याप्रकारे तयार करण्यात यावा,असे ते यावेळी म्हणाले.धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी जागा निश्चित करण्यात आली आहे का याबाबत देखील त्यांनी विचारणा केली.

पालकमंत्री प्रा.डॉ.सावंत यावेळी म्हणाले,यावर्षी पाऊस कमी झाल्याने जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती आहे.जनावरांसाठी चारा छावण्या उभारण्याचे नियोजन आहे. जिल्हा आकांक्षित आहे.जिल्ह्याचे मागासलेपण लक्षात घेता जिल्ह्याच्या विकासाकरिता सन 2024- 25 च्या आराखड्यात जिल्ह्यासाठी 350 ते 400 कोटींची अतिरिक्त मागणी मान्य करावी अशी विनंती पालकमंत्री प्रा.डॉ.सावंत यांनी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांना यावेळी केली.

जिल्हाधिकारी डॉ.ओंबासे यांनी यावेळी सांगितले की,सन 2024 - 25 च्या सर्वसाधारण योजनेची नियतव्यय मर्यादा 319 कोटी रुपये आहे.268 कोटी रुपयांची अतिरिक्त मागणी करण्यात आली आहे.दोन आठवड्यात प्रशासकीय मान्यता देऊन यंत्रणांना निधी वितरित करण्यात येईल. शाळा व अंगणवाडी दुरुस्ती,जनसुविधा,वीज वितरणची व जलसंधारणची कामे व ग्रामीण रस्ते दुरुस्तीसाठी अतिरिक्त मागणी करण्यात आली आहे.आदर्श शाळा प्रकल्पाचा शंभर कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे.आयटीआय व सिंचन विभागाची जागा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी निश्चित करण्यात आली आहे. श्री.तुळजाभवानी मंदिर संस्थान येथील दर्शन मंडपासाठी जागा सुचविण्यात आली आहे.एक महिन्यात याबाबत मंत्रालयात बैठक घेण्यात येईल. सर्वसमावेशक असा जिल्हा विकास आराखडा तयार करण्यात आला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# धुळ्यात गोडाऊनमध्ये ईव्हीएमची तोडफोड!

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील देवपूर परिसरातील केंद्रीय महाविद्यालय लगत असलेल्या धान्य गोडाऊन या ठिकाणी गेल्या अनेक वर्षापासून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या ठिकाणी ईव्हीएम मशीन ठेवले जातात या ठिकाणी काही अज्ञात चोरट्यांनी येथील प्रवेशद्वारा जवळ असलेले सीसीटीव्ही कॅमेरे मोडतोड करून आत प्रवेश करून गोदाम क्र.1,2,3 या शासकीय मालमत्ते मध्ये अनधिकृत प्रवेश करुन,गोदाम क्रं 2 मधले येथील राज्य निवडणूक आयोगाच्या वरील ठेवलेल्या ईव्हीएम मशिन गोदामात प्रवेश करुन त्यांना बेकायदेशीर पणे बाहेर काढून त्यांची मोडतोडकरणे तसेच गोदाम क्र.3 मध्ये देखील कोपऱ्याच्या खिडकीचा एक लोखंडी गज तोडुन प्रवेश



केलेला आढळून आला व त्यातील निवडणुकी संबंधित साहित्य असलेल्या पेट्या उघडल्याचे दिसून आले.ज्यात गोदाम क्रं 1 शासकीय मालमत्तेमध्ये अनधिकृत प्रवेश करणे, भारत निवडणूक आयोगाच्या साधन सामग्रीची तोडफोड करुन नुकसान व्ही व्हि पॅट,बॅटरी,कंट्रोल युनिट बॅटरी,पेपर रोलची चोरी केल्या असल्याचा देवपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून,सदर घटनेची माहिती मिळतात निवडणूक शाखेचे धुळे जिल्हा निवडणूक अधिकारी अंतुर्लीकर,तसेच धुळे ग्रामीण तहसीलदार अरुण शेवाळे यांनी घटनास्थळी दाखल होऊन पाहणी केली,तसेच पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल झाले होते याबाबत पुढील तपास चालू असल्याचे समजते,तर कॅमेरेची मोडतोड करून कॅमेरे तेथेच फेकून चोरटे पसार झाले असल्याची समजते.

# जुगाऱ्यांवर पोलिसांची धाड, आठ जणांविरुद्ध कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** वेरुळ परिसरात शार्दुलवाडी ता.खुलताबाद.अजमतखां बिस्मिल्ला खॉं यांच्या शेताच्या खोलीत तिरट नावाचा जुगार सुरु असल्याचे गुप्त माहिती विशेष पथकाला कळाल्यावर त्यांनी शेतात जावुन अचानक धाड टाकली धाडीमुळे जुगाऱ्यांनी पळ काढला परंतु त्यांना मुद्देमाल सह पोलीसांनी धरपकड केली त्यामुळे एकच खळबळ उडाली. पोलिस अधीक्षक कार्यालय (ग्रामीण) येथील विशेष पथकाला गस्ता वेळी याची खबर लागल्याने त्यांनी आपला मोर्चा शार्दुलवाडी अजमतखां यांच्या शेताकडे वळवला येथे बंद खोलीत पत्ते



तिरट नावाचा जुगार सुरु होता व सातआठ जणं येथे खेळत होती.पथकांनी अचानक धाड टाकत जुगाऱ्यांना घेरले व अचानकपणे छाप्याने जुगारी घाबरले व ते वाट मिळेल तिकडे पळु लागले मात्र पथकातील पोलिसांनी त्यांची धरपकड केली. यात त्यांच्या ताब्यातून रोख २५हजार ८३० रुपये,चारदुचाकी वाहने,दोन आटो रिक्षा, मोबाईल, जुगार खेळण्यांचे साहित्य पोलिसांनी हस्तगत केले.ही घटना (दि.८) सोमवारी रात्री घडली याप्रकरणी जुगारी आरोपी शेख करिम, आसिफ खान,हमीद शेख,जाकेर शेख, आकाश शिंदे,सईद अब्दुल सत्तार,शेख हमीद इब्राहिम आदिंसह सात ते आठ जणांविरुद्ध गुन्हा खुलताबाद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असुण पुढील तपास पोलीस करत आहे.

# तब्बल 56 वर्षांनी मित्र - मैत्रिणी जमले एकत्र

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** दि. 9 जानेवारी रोजी हॉटेल तुलसी कम्फर्ट नांदेड येथे प्रतिभा निकेतन हायस्कूल एसएससी बॅच 1968 चा स्नेह मिलन कार्यक्रम काल संपन्न झाला.जवळपास 56 वर्षाने सर्व मित्र मैत्रिणी एकत्र जमा झाले.त्यावेळेसचे शिक्षक मधुकरराव राहेगांवकर आणि ल.ज.देशमुख यांना प्रमुख अतिथी म्हणून आंमत्रित केले होते. सकाळी नऊ ते चार असा कार्यक्रम होता.यात नाश्ता जेवण चहा इ.समाविष्ट होते. गुरुजनांचा सत्कार शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. सत्काराला उत्तर देताना दोन्ही सरांनी मुलांविषयी चांगले उद्गार काढून उपक्रमाची तारीफ करत आशीर्वाद दिला व सातत्य ठेवा हा सल्ला दिला .सदर स्नेह मिलनात परिचय ,गाणे ,कविता इत्यादीच मनोरंजनाचा समावेश होता. दीप प्रज्वलन व सरस्वती स्तवन ने सुरुवात होऊन राष्ट्रगीत व 1968 च्या काळी जी प्रार्थना होती ती प्रार्थना सगळ्यांनी एका सुरात म्हणून जुन्या आठवणींना उजाळा दिला.सदर स्नेह मिलनाचा कार्यक्रम यशस्वी होण्या साठी ओमप्रकाश हुरणे, लक्ष्मीकांत सांगवीकर ,सतीश हातवळणे, सतीश नांदेडकर, सुधाकर पांडे, काशिनाथ फटाले,डॉ. उमाटे ,शंकर जवादवार इत्यादींनी परिश्रम केले. संचालन लक्ष्मीकांत सांगवीकर यांनी समर्थपणे करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. या कार्यक्रमात ग्रुप फोटो काढून सर्वांना तो भेट देण्यात आला. ऐक छान ऊपक्रम करुन 56वर्षाने सगळ्यांना एकत्र आणले या बद्दल सर्वांनी आयोजन समितीस धन्यवाद दिले.या कार्यक्रमा साठी खास मुंबई,ठाणे,औरंगाबाद ,पुणे,परभणी,हिंगोली परभणी शहरात मुलं मुली सहभागा साठी ऊपस्थित होत्या .यात महाराष्ट्र टाईम्सचे माजी उप संपादक व प्रसिद्ध विचारवंत श्री दिवाकर देशपांडे यांची उपस्थिती व त्यांचे मनोगत हे सर्वानाच आवडले.



# वरोऱ्यात रंगणार डब्ल्यूएसएफ चषक राज्य अजिंक्यपद व्हॉलीबॉल स्पर्धा

आधुनिक केसरी न्यूज

**वरोरा :** स्पोर्टस फाउंडेशन वरोरा (डब्ल्यूएसएफ) व लोकशिक्षण संस्था वरोडा यांचे संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र राज्य व्हॉलीबॉल संघटनेच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्य आंतरजिल्हा पुरुष गट व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन लोकशिक्षण संस्थेमधील व्हॉलीबॉल या खेळाला 51 वर्ष पूर्ण होत असल्याबद्दल लोकमान्य महाविद्यालय, वरोरा (स्व. मनोहरभाऊ पाटील क्रीडा परिसर) येथे दिनांक 1/02/ 2024 ते 4/02/2024 दरम्यान डब्ल्यूएसएफ चषक व्हॉलीबॉल स्पर्धा दिवस- रात्र पद्धतीने आयोजित करण्यात आलेली आहे. स्पर्धेकरिता चार मैदाने सज्ज करण्यात आलेली असून तीन मैदानावर विद्युत प्रकाश झोताची व्यवस्था करण्यात आलेली आहे. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील किमान 32 जिल्हा संघ सहभागी होतील. वरोरा स्पोर्टस फाउंडेशन वरोरा व लोकशिक्षण संस्था वरोडाचे यशस्वीपणे सलग सातवे आयोजन असून यानिमित्ताने वरोरा शहरात 380 खेळाडू व 80पदाधिकारी, पंच, प्रशिक्षक स्पर्धेच्या निमित्ताने दाखल होणार आहे. क्रीडा रसिकांसाठी ही स्पर्धा अभूतपूर्व मेजवानी ठरणार आहे.वरोरा स्पोर्टस फाउंडेशन व लोक शिक्षण संस्थेचे खेळाडू सतत दरवर्षी राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करतात. त्याचप्रमाणे

Warora Sports Foundation

सतत सलग राज्यस्तरीय, राष्ट्रीयस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. उद्घाटन प्रसंगी गडचिरोली जिल्हा क्रीडा अधिकारी श्री प्रशांत दोंदल यांचा सपत्निक सत्कार करण्यात येणार असून स्पर्धेचे उद्घाटन वरोरा विधानसभा क्षेत्राच्या लोकप्रिय आमदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी चंद्रपूर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री रवींद्रसिंग परदेशी साहेब( आयपीएस) हे असणार आहे. स्पर्धेचे स्वागताध्यक्ष लोक शिक्षण संस्था वरोडा चे अध्यक्ष प्रा.श्रीकांत पाटील असून मुख्य पाहुणे म्हणून राजाराम बापू पाटील साखर कारखाना इस्लामपूर जिल्हा सांगलीचे चेअरमन व महाराष्ट्र व्हॉलीबॉल संघटनेचे अध्यक्ष श्री प्रतीक जयंत पाटील हे असणार आहे. पाहुणे म्हणून वरोरा चे माजी नगराध्यक्ष अहेतेशाम अली, प्राचार्य अशोकजी जीवतोडे सचिव,चांदा शिक्षण प्रसारक मंडळ चंद्रपूर, लोकशिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्रीकृष्ण जी घड्याळपाटील ,वरोराच्या एसडीओ श्रीमती शिवनंदा लंगडापुरे, एसडीपीओ नयोमी साटम (आयपीएस), नागपूर विभागीय क्रीडा उपसंचालक श्री शेखर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री अविनाश पुंड, श्री मुकेश जीवतोडे शिवसेना जिल्हाप्रमुख (उबाठा) , डॉ. कपिल गेडाम न्यूरोलॉजिस्ट चंद्रपूर ,सामाजिक कार्यकर्ते किशोरजी टोंगे, एक्सलंट अर्कडमीचे संचालक श्री अभय टोंगे, ॲड. गजानन बोढाले, स्पर्धा यशस्वी करण्याकरिता वरोरा स्पोर्ट्स फाउंडेशन वरोरा (डब्ल्यूएसएफ) चे अध्यक्ष गजानन जीवतोडे, किशोर पीरके, सुनील बांगडे , विनोद उंमरे, गोपाल नरोले, महाराष्ट्र वॉलीबॉल संघटनेचे सचिव विरल शहा व सर्व सहकारी प्रयत्न करीत आहेत.

# शाळेला चार हजारांची पुस्तके भेट देऊन वाढदिवस साजरा

## किरण साकरकर मॅडम यांचा आगळा वेगळा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** ISO जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा मल्हारा पंचायत समिती अचलपूर येथील शिक्षिका किरण साकरकार यांनी आपला वाढदिवस विद्यार्थ्यांना शालेय गोष्टीचे तसेच प्रेरणादायी पुस्तक देऊन साजरा केला. विद्यार्थ्यांनी बोधकथा वाचाव्या त्यापासून त्यांनी प्रेरणा घ्यावी आणि आपल्या आयुष्यामध्ये ते साकार करावी असे त्या आपल्या वाढदिवसाच्या प्रसंगी बोलल्या. आपला वाढदिवस त्यांनी विद्यार्थ्यांच्या सोबत साजरा केला. किरण साकारकार यांनी ISO जिल्हा परिषद उच्चं प्रा. शाळा मल्हाराला चार हजार रुपये किमतीचे प्रेरणादायी पुस्तकं भेट दिले यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका कुमारी शीला सोळंके मॅडम, केंद्रप्रमुख मा. श्रीकृष्ण उघडे सर, आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त बबलू कराळे सर, कल्पना चौधरी मॅडम, बबिता पंडित मॅडम, रश्मी पानझाडे मॅडम, दिनकर राऊत सर, रातीराम मावस्कर सर तसेच सर्व विद्यार्थी हजर होते.



# माळेगाव यात्रेत शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय



आधुनिक केसरी न्यूज

**मोहन पवार**

**लोहा :** दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेल्या माळेगाव यात्रा येथील यात्रेकरूंना शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय केली असून यात्रेतील यात्रेकरूंना तब्बल ७ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात असल्याची माहिती कार्यकारी अभियंता अमोल पाटील यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.

दरवर्षी यात्रेकरूंसाठी जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाकडून यात्रेतील यात्रेकरूंसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याचे नियोजन केले जाते. यंदा यात्रेतील जनावरांच्या सोयीसाठी तब्बल १७ हौद,जमिनीवरील १० टाक्या तोट्या बसवून शुद्ध पाण्याचा पुरवठा उपलब्ध करून दिलेला आहे. यात्रेच्या पूर्वी पंधरा दिवसापासून शुद्ध पिण्याचे पाणी मुबलक ब्लिचिंग पावडरचा व तुरटीचा वापर करून १ लक्ष ७१ हजार मिलि पाणी शुद्धीकरण करून यात्रेकरूंना पुरवठा केला जात आहे. सदरील यात्रेत ७ टँकर उपलब्ध केले असून त्यापैकी ४ टँकर जिल्हा परिषद लातूर २ टँकर सा.बा.विभाग हिंगोली तर १ मोठे टँकर गुरुद्वारा नांदेड यांच्याकडून उपलब्ध केले आहेत. यात्रेकरूंना पिण्याच्या पाण्याची गैरसोय होऊ नये म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल यांच्या नेतृत्वाखाली जि.प.चे कार्यकारी अभियंता अमोल पाटील, ए एन भोजराज, एस एस डिकळे, पाथरकर, एरोळकर आदींसह कर्मचारी परिश्रम घेत आहेत. सदरील पाणी दररोज आरोग्य विभागाकडून तपासणी करून नियमितपणे यात्रेकरूंना पुरवठा केला जात आहे.

# लाळ खुरकूत, पीपीआर लसीकरणाला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** येथील पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या एकूण बारा गावांमध्ये मोठ्या जनावरांमधला लाळ - खुरकूत आजार व लहान जनावरे शेळी व मेंढी मधला पीपीआर नावाच्या आजारावर पशुवैद्यकीय दवाखान्या मार्फत लसीकरणाची सुरुवात झालेली आहे. या दवाखान्याच्या अंतर्गत एकूण सहा हजार मोठे पशु तर आठ ते दहा हजार लहान शेळी व मेंढी इतके पशुधन आहे. ममुराबाद वाडी या गावापासून या लसीकरणाची सुरुवात झालेली असून आत्तापर्यंत सोबलगाव आणि पाडळी मध्ये देखील या दोन्ही रोगांचे लसीकरण करण्यात आले आहे .येणाऱ्या पंधरा दिवसांच्या काळामध्ये संपूर्ण कार्यक्षेत्रात लसीकरण करण्यात येईल असे येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विजापुरे यांनी सांगितले. सर्व पशुपालकांनी आपल्या मोठ्या तसेच लहान जनावरांना या दोन्ही रोगांची प्रतिबंधक लस टोचून घ्यावी .एकदा ही लस टोचल्यानंतर पुढचे सहा महिने ते एक वर्षापर्यंत या रोगांविरुद्ध प्रतिकारक शक्ती पशुंमध्ये राहील. कुठलाही पशुपालक त्याच्या जनावरांना लसीकरणापासून मुक्त ठेवू नये असे आव्हान देखील डॉक्टर विजापूरे यांनी जनतेस केले आहे.



# वडोदबाजार पोलीस व माणुसकी समूहाच्या मदतीने मनोरुग्णास उपचारासाठी मदत

## गेल्या तीन महिन्यात १२ मनोरुग्णांना येरवडा येथे माणुसकी टीमने केले उपचारासाठी दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील वडोद बाजार येथील सदर मनोरुग्ण व्यक्ती नामे शिवाजी सर्जेराव गाडेकर वय २९ वर्षे राहणार वडोदबाजार या.फुलंब्री दिनांक ०९-०१-२४ रोजी संतोष गाडेकर पेशंट चार भाऊ व गावातील व्यक्तीच्या तक्रारिचे चे पत्र वडोदबाजार पोलीस स्टेशन येथे माहिती दिली कि सदर व्यक्ती हा हिंसक वागत आहे. घरातील व गावातील लोकांना मारहाण करित आहे. रात्री बेरात्री बाहेर फिरतो लोकांना दगडे मारतो घाटी घेऊन गावात फिरतो त्याने कुराडीने गावातील डीप यांचे फ्युज देखील फोडले, व जिल्हा परिषद शाळेत जाऊन मुलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण करतो,त्यापासून लोकांच्या जीवीतास धोका आहे.व तो बऱ्याच दिवसापासून मनोरुग्ण आहे.त्याला या बराळे हॉस्पिटल व कादरी हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल केले होते. वडोदबाजार पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक व्ही.एस. मोरे यांनी मनोरुग्णासाठि काम करणाऱ्या सु-लक्ष्मी सेवाभावी संस्थेचे समाजसेवक सुमित पंडित यांना माहिती दिली असता त्यांनी तात्काळ वडोदबाजार पोष्टे येथे येवून पेशंट ची शाहनीशा केली असता त्याला पकडणे खूप कठीण होते कारण त्याच्याजवळ हत्यार होते रात्री दोनच्या सुमारास त्याच्या घरी तो झोपलेला होता त्या क्षणी त्याला पकडून १०८ च्या सहाय्याने प्रथम उपचाराकरिता त्यास शासकीय रुग्णालय घाटि येथे दाखल केले असता मानसोपचारतज्ज्ञ यांनी पेशंट यास पुढील उपचारासाठी पुणे येथे नेण्याचा सल्ला दिल्यानंतर माणुसकी टिमने कायदेशीर कागदोपत्री पुर्तता करुन आज त्यास पुणे येथे १०८ अँबुलंस वाहनाने उपचारासाठी माणुसकी टिम च्या सभासदांनी मदतकार्य करुन उपचारासाठी येरवडा मेंटल हॉस्पिटलमध्ये पुढील उपचारासाठी दाखल केले. या सामाजिक कार्यात वैद्यकीय अधीक्षक घाटी डॉ. सुरेश हरबडे,सायट्रिक विभागप्रमुख डॉ.प्रसाद देशपांडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक व्हि.एस.मोरे, साहेब संजय जिवरक, हेडकॉन्स्टेबल, रवी देशमुख पोलीस नाईक,राहुल दामधर, पोलीस अंमलदार व १०८ अँबुलंस डॉ.अतुल मुरुगकर, डि.एम.सचिन पालवे,एडी एम, किरण देशमुख, डॉ सुलताने पाटील,अल्लावाले शहा( पायलट ) माणुसकी समुहाचे समाजसेवक सुमित पंडित, समाजसेवीका पुजा पंडित आदिंनी मदतकार्य केले.



# पाईपमध्ये चक्क बिबट्या!

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** तालुक्यातील नांदगावानजीकच्या गोसेखुर्द उपकालव्याच्या पुलाखालील पाईपमध्ये बिबट्याने बस्तान मांडले आहे. त्याला बघण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली. काही शेतकऱ्यांना सर्वप्रथम एका शेतामध्ये हा बिबट आढळून आला होता. माहिती मिळताच नागरिकांनी बिबट्याला पाहण्यासाठी गर्दी केली. यामुळे स्वतःचा बचाव करण्यासाठी बिबट गोसेखुर्द उपकालव्याच्या पुलाखालील पाईपमध्ये शिरला. वनाधिकाऱ्यांनी घटनास्थळ गाठून बिबट्याला जेरबंद करण्यासाठी मोहीम सुरू केली. परिसरात पिंजरा लावण्यात आला आहे.

गोसेखुर्द कालव्याच्या पाईपमध्ये यापूर्वी बिबट आणि वाघ अडकल्याच्या घटना घडलेल्या आहेत. दुसरीकडे, चंद्रपूर शहरात चार अस्वल दिसल्याने नागरिकांमध्ये भीती व दहशतीचे वातावरण आहे. लालपेठ कॉलरी क्रमांक २ येथील समृद्धी नगर भागात ९ जानेवारीला मध्यरात्रीच्या सुमारास चार अस्वल दिसून आले. डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यातही शहरात अस्वल शिरले होते.



# जिल्हा वार्षिक योजनेतून ५० कोटी मंजूर करा

## आ. फारुख शाह यांची अजितदादा पवार यांच्याकडे मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्हा नियोजन आराखडा संदर्भात वित्त व नियोजन मंत्री ना.अजितदादा पवार यांच्या कार्यालयात विभागीय बैठक संपन्न झाली. या बैठकीत आ.फारुख शाह यांनी धुळे शहरातील अल्पसंख्यांक भागात आतापर्यंत जिल्हा वार्षिक योजनेतून कुठलीच कामे झालेली नाही म्हणून जिल्हा वार्षिक योजनेतून अल्पसंख्यांक विभागात रस्ते गटारी पथदिवे आणि मोकळ्या जागांना कुंपण भिंत बांधण्यासाठी 50 कोटी आणि ८० फुटी रस्त्यासाठी १५ कोटीच्या च्या निधीची तरतूद करण्यात यावी अशी मागणी केली.



बुधवार रोजी मंत्रालयातील उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री ना.अजितदादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली धुळे जिल्हा नियोजन बाबत आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत आ.फारुख शाह यांनी धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्या सापत्न वागणूकीवर कोरडे ओढले.पालकमंत्री धुळे शहरातील अल्पसंख्यांक भागाच्या विकासासाठी निधी देतांना दूजाभाव करतात.गेल्या अनेक वर्षांपासून अल्पसंख्यांक भाग विकासापासून वंचित आहे.रस्ते,गटारी,पथदिवे,कुंपण भिंत,पाण्याची पाइपलाइन टाकणे यासारख्या मूलभूत सुविधा देखील मिळणे दुराप्रास्त आहे.म्हणून जिल्हा वार्षिक योजनेचा आराखडा अंतिम करतांना अल्पसंख्यांक भागाच्या विकासाठी ५०कोटी आणि ८० फुटी रस्त्यासाठी १५ कोटीच्या मंजूर करण्यात यावे.तसेच या बैठकीत धुळे शहरातील पाणीप्रश्न,कचरा संकलन यासंदर्भात धुळे अपयशी ठरलेल्या मनपाच्या कारभाराचे वाभाडे आ.फारुख शाह यांनी काढले.याची दखल घेवून बैठकीस अनुपस्थित पालिका आयुक्त यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यास आदेशित केले. ना.गुलाबराव पाटील,ना.अनिल पाटील,आ.विजय सावकारे,ऊर्जा विभागाचे सचिव सौरभ विजय,वित्त व नियोजन विभागाचे सचिव,उपस्थित होते आणि धुळे जिल्हाधिकारी अभिनव गोयल,जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता आणि संबंधित अधिकारी ऑनलाईन उपस्थित होते.




# कविता म्हणजे अंतःकरणातील छोटासा कोपरा उजळणारा दिवा असतो

## डॉ. वृषाली किन्हाळकर यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील पिशोर येथे सहाव्या राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवाचे उत्साहात उद्घाटन झाले असुन कविता म्हणजे केवळ यमक, अनुप्रास नसतो तर कविता म्हणजे अंतकरणातील छोटासा कोपरा उजळवून टाकणारा दिवा असतो असे प्रतिपादन प्रख्यात कवयित्री डॉ.वृषाली किन्हाळकर यांनी सहाव्या राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी केले.

पिशोर येथील समता कन्या विद्यालयात तिफण त्रैमासिक,भाषा साहित्य संस्कृती आणि संशोधन परिषद विद्यमाने राज्यस्तरीय कविता महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.या महोत्सवाच्या अध्यक्षस्थानी डॉ.किन्हाळकर होत्या.यावेळी बोलताना त्या पुढे म्हणाल्या की, कविता ही आत्ममग्न असते.ती लाईक मिळवण्यासाठी, फुलांसाठी किंवा पुरस्कारासाठी नसते.सकस,सरस आणि सहज अनुभवाची अभिव्यक्ती असते.सध्या भाषेची मोडतोड सुरू आहे.मराठी आपली आई आहे परंतु आपण तिची अवहेलना करत आहोत. तुमचा अड्रेस सेंड करा अशी भाषा बोलली जात आहे.आईला आपण फाटक्या लुगडयात उभं करत आहोत अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.प्रख्यात कवि योगिराज माने यांच्या हस्ते दिप प्रज्वलीत करून महोत्सवाचे उद्घाटन झाले.यावेळी बोलताना माने म्हणाले की, तिफण कविता महोत्सवाने ग्रामीण भागामध्ये कविता मुरवली आहे.जसं लोणचं मुरवल्यानंतर रूचकर होतं तसं कविता मुरल्यानंतर अधिक रुचकर होते. ग्रामिण भागात उदंड आनंदाने कविता ऐकली आणि ऐकवली जात आहे त्यामुळे कवितेचे पुढचे दिवस अधिक संपन्नतेचे व माधुर्याचे असतील अशी आशा मला वाटते आहे. प्रास्ताविक तिफनकार प्रा. शिवाजी हुसे यांनी केले. सामाजिक पर्यावरण प्रदूषित होत असताना कविता महोत्सव मनाचे शुध्दीकरण करून महत्त्वाची भूमिका अदा करत आहे. ग्रामीण भागातून अनेक कवी लिहिते झाले आहेत हे या कविता महोत्सवाचे फलित आहे असे प्रा. शिवाजी हुसे यावेळी म्हणाले. याप्रसंगी प्राचार्य विजय भोसले, स्वागताध्यक्ष अड.कृष्णा जाधव,पी. एम.डहाके यांनी मनोगत व्यक्त केले. मंचावर प्रा . प्रतिभा अहिरे, ललिता गादगे, डॉ.प्रेमला मुखेडकर डॉ.सिताराम जाधव, डॉ.अर्चना काटकर,आर.डी. सावळे,भरत चौधरी, सागर जाधव, गणेश घुगे, पांडुरंग गिराम, प्रा.अंबादास सगट प्रा. रंगनाथ लहाने आदिंची उपस्थिती होती. सूत्रसंचालन संदीप ढाकणे, रायभान जाधव यांनी केले.

# आमदार पात्रतेच्या निकालाविरोधात धर्माबादमध्ये ठाकरे गट आक्रमक

## राहुल नार्वेकर यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोनारकर**

**धर्माबाद :** विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी जाहीर केलेल्या 16 आमदार पात्रतेचा निकाल विरोधात शिवसेनाच्या वतीनी पानसरे चौकात प्रतिमेला जोडे मारून निषेध करण्यात आले. यावेळी उपजिल्हा प्रमुख गणेश गिरी, तालुका प्रमुख रामचंद्र रेड्डी, पंचायत समिती माजी सभापती मारोती कागेरू, शहर प्रमुख बालाजी बनसोडे, शिवराज मोकलीकर, गणपत कात्रे, अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.खरी शिवसेना ही एकनाथ शिंदे यांचीच आहे. पक्ष आणि चिन्हही त्यांचेच आहे. असे म्हणत राहुल नार्वेकर यांनी शिवसेना उद्धव ठाकरे गटाला मोठा झटका दिला आहे. तसेच भरत गोगावलेंचा व्हीप वैध आहे असेही त्यांनी म्हटले आहे.यापाठोपाठ सोळा आमदारांपैकी एकालाही अपात्र करता येणार नाही असेही त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे ठाकरे विरुद्ध शिंदे या कायदेशीर लढाईत एकनाथ शिंदे यांनी बाजी मारली आहे. मूळ शिवसेना म्हणून शिंदे गटाला मान्यता देण्यात आली आहे.16 पैकी एकाही आमदाराला अपात्र करता येणार नाही असे (ता.10 )रोजी बुधवारी राहुल नार्वेकर यांनी आपल्या निकाल वाचना दरम्यान म्हटले आहे . सोळा आमदारांना अपात्र ठरवण्याची मागणी शिवसेना ठाकरे गट यांनी केली होती.त्यामुळे शिंदे गटाच्या सोळा सदस्यांवर अपात्रतेची कारवाई करण्याची मागणी फेटाळली जात आहे. राहुल नार्वेकर शिंदे गट खरी शिवसेना असे निकाल देत जाहीर केले आहे.यांचं निर्णया विरोधात शिवसेना ठाकरे गट आक्रम होत पानसरे चौकात विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध करण्यात आले आहे यावेळेस उपजिल्हा प्रमुख गणेश गिरी, तालुका प्रमुख रामचंद्र रेड्डी, पंचायत समिती माजी सभापती मारोती कागेरू, शहर प्रमुख बालाजी बनसोडे, शिवराज मोकलीकर गणपत कात्रे अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर